| १२ | गरोदर मातेच्या आरोग्याकडे दुर्लक्ष | ०९ | ८.४९ |
| १३ | पालकांचे मुलांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष | ०३ | २.८४ |
| | **एकूण** | **१०६** | **१००** |

कोष्टक क्रमांक ५:६ असे लक्षात येत की माता अशक्त व कुपोषित, अंधश्रध्दा, आजारी बालकावर उशिरा उपचार, कातकरी समाजावरील भगतगिरीचा प्रभाव इत्यादी कारणांमुळे कातकरी जमातीमध्ये बालमृत्युचे प्रमाण जास्त दिसून येते. या जमातीतील अंधश्रध्देमुळे (अंधश्रध्दा, भगताकडील चूकीचा उपचार) भगताकडे उपचार त्यामुळे दवाखान्यात उशिरा उपचार, एकूण २९ (२७.३६ टक्के ) बालके मृत्यू झालेली आहेत. तसेच महिलांची योग्य काळजी न घेतल्याने एकूण ३१ (३१.२५ टक्के) बालके मृत्यू पावलेली दिसून येतात.

- **बालके जन्मत : मृत असण्याची कारणे.**

कातकरी कुटूंबातील जन्मास आलेली बालके जन्मतः मृत होती. अशी बालके जन्मातः मृत असण्याचे कारणासंदर्भातील माहिती कोष्टक ५:७ मध्ये दर्शविली आहे.

## कोष्टक क्रमांक ५:७

## बालकांच्या मृत्यूस कारणीभूत घटक

| अ. क्र. | बालके जन्मतः मृत असण्याची कारणे | मृत संख्या | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | माता अशक्त व कुपोषित | १० | ३८.४६ |
| २ | अपुऱ्या दिवसात बाळंतपण | ०८ | ३०.७७ |
| ३ | बाळंतपण नीट न करणे | ०३ | ११.५४ |
| ४ | भगताकडून चुकीचा उपचार | ०३ | ११.५४ |
| ५ | दवाखान्यात चुकीचा उपचार | ०२ | ७.६९ |
| | **एकूण जन्मतः मृत बालके** | **२६** | **१००** |

कोष्टक क्रमांक ५:७ वरुन असे दिसून येते की, माता अशक्त व कुपोषित असल्याने १० बालके (३८.४६ टक्के) मृत पावली. अपुऱ्या दिवसात बाळंतपण व बाळंतपण नीट न करणे या कारणामुळे ११ बालके (४२.३१ टक्के) मृत पावली आहेत तसेच भगताकडून चुकीच्या उपचारामुळे ०३ बालके (११.५४ टक्के) तर दवाखान्यात चुकीचा उपचार झाल्याने ०२ बालके (७.६९ टक्के) मरण पावली आहेत. माता अशक्त व कुपोषित आणि अपुऱ्या दिवसात बाळंतपण या कारणामुळे(६९.२३ टक्के) बालके मरण पावलेली दिसतात.

- **बालकांची काळजी -**

लहान मुलांची योग्य काळजी घेणे महत्त्वाचे असते. योग्य काळजी न घेतल्यास बालके मृत पावतात. कातकरी समाजात मृत पावलेल्या एकूण १०६ बालकांपैकी कोणती योग्य काळजी घेतली तर किती बालके वाचू शकली असती याची माहिती कोष्टक क्रमांक ५:८ मध्ये दिली आहे.

## कोष्टक क्रमांक ५:८

## योग्य काळजी घेतली तर बालके वाचू शकली असती अशा बालकांचे प्रमाण

| अ क्र | घटक | संख्या | शे. प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | दवाखान्यात बाळंतपण | १५ | १७.८६ |
| २ | दवाखान्यात त्वरीत उपचार | ३५ | ४१.६६ |
| ३ | मातेची काळजी | ३४ | ४०.४८ |
| | **एकूण** | **८४** | **१००** |

कोष्टक क्रमांक ५:८ वरुन असे दिसून येते की, एकूण मृत बालकांपैकी ८४ बालके (७९.२६ टक्के) योग्य काळजी घेतली असती तर वाचू शकली असती, वाचू शकलेल्या ८४ बालकापैकी ५० बालके (५९.५२ टक्के) दवाखान्यात बाळंतपण व दवाखान्यात त्वरीत उपचार केला असता तर वाचली असती आणि ३४ बालके (४०.४८ टक्के) मातेची योग्य काळजी घेतली असती तर वाचू शकली असती. याचा अर्थ कातकरी जमातीत दवाखान्यात बाळंतपण व उपचार आणि मातेची योग्य काळजी घेतली असती तर १०६ बालमृत्युपैकी ८४ (७९.२५ टक्के) मृत्यु झाले नसते.

- **शिफारसी**

कातकरी जमातीतील बालमृत्यू रोखण्यासाठी काही महत्त्वाच्या शिफारसी खालील प्रमाणे -

- **सार्वजनिक वितरण व्यवस्था.**

रत्नागिरी जिल्हयातील कातकरी जमातीतील कुटूंबांना पुरेसा आहार मिळत नसल्याने उपासमारीला तोंड द्यावे लागत आहे. म्हणून शासनाने कातकरी भागात 'सार्वजनिक वितरण व्यवस्थे' च्या माध्यमातून उच्च प्रतीचे अन्नधान्य वाटप करावे. कातकरी भागामध्ये अन्न सुरक्षेसाठी स्वस्त धान्य दुकानातून गहू, तांदूळ, रॉकेल या बरोबर तेल, मीठ, भाजीपाला, मांस, दूध, फळे व वस्त्र यांचे माफक दराने वाटप करावे. तसेच इतर समाजाच्या तुलनेने कातकरी समाजाला अन्न धान्य वाटप करत असताना प्रती युनिट प्रमाणामध्ये वाढ करावी.

- **धान्य कोष योजना.**

या समाजासाठी धान्य कोष योजना सुरु करावी आणि या योजनेतून लोकांना वेळोवेळी पुरेसे व माफक दरात अन्नधान्य पुरवठा करावा.

- **कुपोषण लवकर ओळखणे.**

कातकरी समाजातील बालकांमध्ये होणारे कुपोषण लवकरात लवकर ओळखले पाहिजे. त्यासाठी बालकांची प्रत्येक महिन्याला प्राथमिक स्वरुपाची तपासणी करणे आवश्यक आहे. हे कार्य प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत झाले पाहिजे.

- **तातडीने उपचार.**

तपासणीतून कुपोषण सिध्द झाल्यास त्या बालकांवर आरोग्य केंद्रामध्ये तातडीने उपचार केल्यास कुपोषित बालकांच्या मृत्युचे प्रमाण कमी करता येऊ शकते.

- **अंधश्रध्दा निर्मूलन.**

या समाजात कमालीची अंधश्रध्दा दिसून येते. अंधश्रध्देमुळे

भगत, वैद्य व घरीच उपचार केल्याने कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे. म्हणून अंधश्रध्दा निर्मूलनासाठी शाळा, महाविद्यालय व स्वयंसेवी संस्थांनी प्रयत्न करावेत. अंधश्रध्दा निर्मूलन कायद्यांची अमंलबजावणी व महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढवावे.

- **मद्यपान टाळणे.**

या जमातीमध्ये पुरुषांबरोबर गरोदर महिला मद्यपान करतात. त्यामुळे अशक्त व कुपोषित बालके जन्मास येतात. तेव्हा महिला व पुरुषांना मद्यपानापासून दूर करण्यास प्रयत्न करावे.

- **अल्प किंमतीत संतुलित आहार.**

कुपोषण व बालमृत्यूचे प्रमुख कारण म्हणजे सकस, पोषक व संतुलित आहाराची कमतरता होय. म्हणून सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून उच्च प्रतिच्या अन्नधान्याबरोबर भाजीपाला, मांस, अंडी, दूध इत्यादींचा अल्प किंमतीत पुरवठा करावा. तसेच शासनाच्या आहार योजना प्रभावीपणे राबवाव्यात.

- **वैद्यकीय सुविधांचा घरोघरी पुरवठा.**

बालकांची योग्य काळजी ग्रामीण भागातील कातकरी समाजाला आर्थिक दुर्बलतेमुळे चांगल्या प्रकारच्या आरोग्याविषयक सेवा उपलब्ध होत नाहीत. म्हणून शासनाने फिरत्या आरोग्य पथकांच्या माध्यमातून कातकरी कुटूंबांना घरोघरी आरोग्य सेवा दिली जावी.

- **कुटूंब नियोजन सक्तीचे करणे व लहान कुटूंबाचे महत्त्व पटवून देणे.**

या जमातीमध्ये जन्मास येणाऱ्या बालकांची संख्या जास्त आहे. त्यामुळे बालके अशक्त व कुपोषित जन्मास येतात. सक्तीने कुटूंब नियोजन करणे. तसेच या जमातीतील जोडप्यांना नसबंदी करुन घेण्यास प्रलोभने देणे, प्रमाणपत्र देऊन गौरव करणे आणि लहान कुटूंबाचे महत्त्व पटवून देणे.

- **बालसंगोपन केंद्र.**

बालकांची योग्य काळजी घेण्यासाठी कातकरी पाडयांमध्ये बालसंगोपन केंद्र स्थापन करणे. त्या केंद्रामधून बालकांना पोषक व सकस आहार पुरवठा, आरोग्य सेवांचा पुरवठा, तसेच लहान बालकांची योग्य काळजी घेणे इत्यादी सहकार्य बालसंगोपन केंद्रामधून करावे.

- **महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे.**

या जिल्हयातील कातकरी समाजातील बहुसंख्य बालके, आई कुपोषित व अशक्त आणि गरोदर मातेची योग्य काळजी न घेतल्याने कुपोषित व मृत्यू पावलेली आहेत. त्यामळे गरोदर मातेची योग्य काळजी घेणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी गरोदर मातेस सकस व पोषक आहार उपब्ध करणे, आरोग्यविषयक सेवा उपलब्ध करुन देणे, मद्यपान नियंत्रण, लोहयुक्त गोळया वाटप व प्रती महिना गरोदर मातेची तपासणी करुन उपचार करणे.

- **भगत, वैद्य व घरीच उपचारा-ऐवजी दवाखान्यात त्वरीत उपचार करणे.**

कातकरी बांधवांच्या चुकीच्या उपचारामुळे म्हणजे भगत, वैद्य व घरीच उपचार केल्याने बालकांच्या मृत्यूचे प्रमाण कमी होऊ शकते. कातकरी पाडयांमध्ये गलिच्छ वातावरण व अशुध्द, गढूळ व दूषित पाण्यामुळे साथीचे रोग पसरतात. त्यावर नियंत्रण म्हणून राहण्यासाठी मोकळी जागा देणे, स्वच्छता मोहिम, मलेरिया डॉक्टर तपासणी, पिण्याचे स्वच्छ व शुध्द पाणी उपलब्ध करुन देणे.

- **समन्वय साधणे.**

कातकरी पाडयातील आरोग्य सुविधांबाबत आरोग्य कर्मचाऱ्यामध्ये कमालीची उदासीनता दिसून येते. ती दूर करणे तसेच कातकरी समाजाचा सहभाग वाढविणे व आरोग्यविषक शिक्षण उदा. आरोग्य तपासणी शिबिर, प्रशिक्षण इत्यादी होय.

- **शासनाने कुपोषण निवारणा साठी विशेष मोहिम व बालमृत्यू मुक्त अभियान सुरु करुन त्या माध्यमातून कुपोषण व बालमृत्यूवर उपाय करावे.**

रत्नागिरी जिल्हयातील कातकरी जमातीतील बालमृत्यूच्या समस्येच्या अभ्यासासाठी संकलित माहितीच्या विवेचनावरुन असे दिसून येते की, कातकरी समाजात जन्मतः मृत बालकांचे प्रमाण जास्त आहे. त्यास दारिद्रय, कायम उत्पन्न साधनांची कमतरता, गरोदर महिलांचे आरोग्य व आहाराकडे दुर्लक्ष हा महत्त्वाचा घटक जबाबदार असून अंधश्रध्देमुळे गरोदर महिला आजारी असताना भगताकडून चुकीचे व घरीच उपचार केला जातो. एकूण बालमृत्युंमध्ये मुलींचे (स्त्री जाती)

मृत्युचे प्रमाण जास्त दिसून येते. या शिवाय अंधश्रध्दा व महिलांची योग्य काळजी न घेतल्याने अधिक बालमृत्यु झालेले दिसून येतात. आदिवासी भागात बालमृत्यू कुपोषण, उपासमारी या शासनाच्या उदासीनतेमुळे होतात हा प्रश्न गौण असला तरी बालमृत्यूचे प्रमाण इतर समाजाच्या तुलनेने अधिक दिसून येते.

* * *

**संदर्भ.**


१. अर्थसंवाद,जानेवारी-मार्च-२००७, खंड -३० अंक ४

२. अर्थसंवाद, आक्टोबर-डिसेंबर-२००८, खंड - ३२, अंक ३.

३. Economic Survey of India,२०१०-११

# भीमाशंकर क्षेत्रातील वैद्यकीय पर्यटन : आदिवासीना रोजगारांची संधी

* डॉ. विलास रामचंद्र उगले

**प्रस्तावना**

नव्या प्रगत तांत्रिक व औद्योगिक प्रगतीमुळे ज्ञानाच्या कक्षा रुंदावत गेल्या त्यामुळेच देशादेशातील सीमा अदृष्य होत चालल्या व जग जवळ येत गेले, याचीच परिणिती म्हणजे पर्यटन व्यवसायाची कक्षा. कल्पवृक्षा प्रमाणेच दिवसेंदिवस रुंदावत गेलेली दिसून येते. एकविसाव्या शतकात पर्यटन जगातला प्रथम क्रमांकाचा उद्योग असेल असे भाकित तज्ञांनी व विविध संघटनेने वर्तविले आहे. एकविसाव्या शतकातल्या संगणक संस्कृतीमुळे जगाचा चेहरा झपाटयाने बदलत चालला आहे. देशाला परकीय चलन मिळवून देऊन देशाची आर्थिक स्थिती भक्कम करणारा, बदलते आर्थिक धोरण व औद्योगिक विकासाची होणारी वृध्दी, शासकीय धोरण यांचा परिपाक शेवटी आर्थिक घटका जवळ येतो म्हणूनच भारतीय पर्यटन क्षेत्राचा उदय कालखंडा नुसार बदलत गेलेला दिसून येतो.

आधुनिक काळातील मुक्त अर्थव्यवस्था व जागतिकीकरण यांचा परिपाक म्हणजे पर्यटन क्षेत्राला गतीमानता प्राप्त झालेली दिसून येते. आजच्या पर्यटन व्यवसायामध्ये आजमितीला अमुलाग्र बदल झालेले दिसून येतात. आजच्या पिढीमध्ये पर्यटन म्हणजे केवळ सुख वा आनंद, व्यवसाय, क्रिडा, अधिवेशने , मधुचंद्र इत्यादी नविन संकल्पना उदयास येऊन त्यांचा विकासही झपाटयाने होत आहे. त्यापैकीच एक म्हणजे वैद्यकिय पर्यटन अशीच एक नविन संकल्पना सध्या जोर धरत आहे. पुरातन आयुर्वेदाने सांगितल्याप्रमाणे वनौषधीची मालिश, तैलस्नान, औषधीयुक्त बाष्पस्नान तसेच योगाभ्यास व ध्यानधारणा अशा पध्दतीनी शरीर व चित्त शुध्द करण्यासाठी पर्यटक पर्यटन स्थळाच्या शोधात आहेत. आधुनिक जगाच्या अर्थकारणात आघाडीचे स्थान मिळवलेल्या या व्यवसायाचा सतत बदलत्या पैलूचा हा एक भाग आहे.

* प्राध्यापक भूगोल विभाग, सर परशुमराम भाऊ महाविद्यालय, टिळक रोड, पुणे ३०

**वैद्यकीय पर्यटन :-**

आजच्या आधुनिक काळात संगणक प्रणाली, विज्ञान, तंत्रज्ञान व दळणवळणातील क्रांतीमुळे जग जवळ आले आहे. पूर्वीच्या कालखंडामध्ये आरोग्यविषयक समस्या सोडविण्यासाठी दुसऱ्या देशात जाणे ही पध्दत नविन नसली तरी परिणामी वैद्यकिय उपचारांसाठी दुसऱ्या राष्ट्रात जाण्याची श्रीमंतांची मक्तेदारी आजमितीला मोडीत निघाली आहे. वैद्यकिय पर्यटनाची स्वतंत्र व्याख्या करणे गुंतागुंतेचे आहे. कारण यामध्ये अनेक विषयांची गुंतागुंत असली तरीही काही तज्ञांच्या व्याख्या येथे विचारात घेणे क्रमप्राप्त आहेत त्या पुढीलप्रमाणे.

**रेना पॉल यांच्या मताप्रमाणे :-**

पर्यटन किंवा आरोग्य पर्यटन म्हणजे वैद्यकिय उपचारांसाठी रुग्णांची एका प्रदेश किंवा स्थळा वरुन दुसऱ्या प्रदेशात क़िंवा क्षेत्रात प्रवेश करणे होय .

**वैद्यकीय पर्यटन ही व्यापक संकल्पना :-**

वैद्यकीय पर्यटन म्हणजे वैद्यकीय उपचारांबरोबर एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील संस्कृती, इतिहास व लोकजीवन समजावून घेऊन स्वत:चे मनोरंजन करुन स्थानिक उपचार पध्दतीचा अवलंब करुन घेणे होय,

एकविसाव्या शतकात वैद्यकीय पर्यटनास चालना देणारा भारत हा आघाडीचा देश आहे. भारताकडे मोठया प्रमाणावर पर्यटकही आकर्षिक होत आहेत कारण भारतामध्ये विविध प्रकारची जैवविविधते मध्ये समृध्दी आहे. भारतातील वैद्यकीय पर्यटनांची बाजारपेठ अंदाजे ३५ कोटी डॉलरची असून जवळपास २ लाख परदेशी पर्यटक येथे येण्याचा अंदाज आहे. कारण भारतातील वैद्यकीय पर्यटनांचे क्षेत्र दरवर्षी ३० टक्के वाढत आहे. भारतात आयुर्वेदात सांगितल्याप्रमाणे पारंपारिक उपचार पध्दतीद्वारा दीर्घ तीव्र दुखणाऱ्या रोगांचा समुळ नायनाट करण्यावर भर दिला जातो.

**भीमाशंकर अभयारण्याची भौगोलीक पार्श्वभूमी :-**

| | | |
|---|---|---|
| अभय अरण्याचे एकूण भौगोलीक क्षेत्र | - | १३०.७८ चौ.कि.मी. |
| अभय अरण्यात एकूण पडणारे सरासरी पर्जन्यमान | - | २२०० मीलीमिटर |
| वाहतुकीच्या दृष्टिकोनातून पुणे ते भीमाशंकर अंतर | - | १२० कि.मी. |
| भीमाशंकर डोगरांची समुद्र सपाटीपासूनची उंची | - | ३३४८ फुट |

वैद्यकीय पर्यटन व्यवसायाच्या विकासासाठी केंद्र तसेच राज्य सरकार कडून ठोस पावले उचलली जात आहे.

**भीमाशंकर अभय अरण्यातील वैद्यकिय पर्यटनाच्या संधी :-**

आजच्या औद्योगिक काळात जगातील विविध जैवघटनांचे ज्ञान संगणक

क्रांतीमुळे लवकरच सर्वाच्या पुढे येत आहे. याची जाणिव जागृती सर्वासाठी करुन देऊन, पुढील पिढीसाठीच्या भविष्यासाठी योग्य प्रकारची व्यूहरचना करणारी चौरस बुध्दी, अपार मेहनत करण्याची मानवी मनाची तयारी आणि सकारात्मक दृष्टिकोन असणाऱ्या प्रत्येकाला या उद्योगात आणून रोजगारांच्या भरपूर संधी उपलब्ध आहेत त्या पुढीलप्रमाणे :-

१. भारतीय गृह मंत्र्याद्वारे वैद्यकीय उपचारांसाठी भारतात येणाऱ्या रुग्णाना आणि त्याच्या कुटुंबियांना एका नविन श्रेणीच्या मेडिकल व्हीसाची सुरुवात केली गेली आहे.

२. भीमाशंकर परिसरात विविध प्रकारचे (धार्मिक, पक्षी निरीक्षक, गिर्यारोहक, अभ्यासक पर्यारणवादी इ. ) पर्यटक येतात त्यांना वैद्यकीय पर्यटनांचे महत्व पटवून देण्यासाठी मंदिराभोवती किंवा निडगाळे या गावाजवळ माहितीचे फलक लावावेत.

३. भीमाशंकर निसर्गरम्य ठिकाण असल्याने येथे वैद्यकिय पर्यटनांस बराच वाव आहे. त्यामुळेच वैद्यकिय उपचार घेतल्यानंतर रुग्णांना आरामाची आवश्यकता असते तशी सुविधा भीमाशंकर परिसरात निर्माण करावी.

४. केरळच्या धर्तीवर भीमाशंकर परिसरात आयुर्वेदिक उपचार केंद्रे स्थापन करुन सुविधा पुरविण्यासाठी स्थानिक आदिवासी जमातीची मदत घ्यावी.

५. भीमाशंकर अभय अरण्यात विविधप्रकारच्यावनौषधी आहेत. आयुर्वेदामध्ये वैद्यक शास्त्रीय दृष्टया महत्व व उपयोग सविस्तर स्पष्ट केले आहेत.

६. महाराष्ट्रातील बाळहिरडा उत्पन्न या प्रदेशात मोठया प्रमाणात घेतले जाते, त्याचे वैद्यक शास्त्रीयदृष्टया महत्व व उपयोग सविस्तर स्पष्ट केले आहेत.

७. भीमाशंकर अरण्यामध्ये बिबा, अंजन, व विविध प्रकारची वनौषधी सापडते.

८. भीमाशंकर परिसराच्या गावात आजमितीला चांगल्या देवराया असून, या देवरायांमध्ये वनौषधीचे भांडार आहे. यामध्ये हिरडा अंजन, जांभूळ, करवंदी, ताटी, आळवी, तोरणी, चिंचरोटह, शिकेकाई, छोटी कंरज, विळस, समुदशोक इत्यादी वनौषधी सापडतात.

९. भीमाशंकर परिसराच्या जवळच्या गावात प्रत्येक वाडीमध्ये १५ ते २० लोक बेरोजगार आहेत. त्यामुळे पर्यटन व्यवसायास लागणारे मनुष्यबळ सहज उपलब्ध होईल.

**वैद्यकिय पर्यटन क्षेत्रातील समस्यावंर उपाय :-**

१. सहयाद्रीतील भूप्रदेशाचे सौदर्य अबाधित ठेवण्यासाठी स्थानिक आदिवासी व इतर लोकांना या विकासाच्या प्रक्रियेत सहभागी करुन उपचार केले जावेत जेणेकरुन प्राचीन व समग्र उपचार पध्दतीला विश्वमान्यता मिळून वैद्यकिय पर्यटनाला चालना मिळेल.

२. वैद्यकिय पर्यटनाबाबत स्थानिक पातळीवर, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर जाणिव जागृती व प्रबोधन करणे गरजेचे आहे.

३. वैद्यकिय पर्यटन क्षेत्राच्या विकासासाठी स्थानिकांच्या विविध सत्य प्रसंगाची माहिती व त्याला आर्थिक सहाय्य प्रसंगी खाजगी गरजेनुसार घेणे.

४. वैद्यकिय पर्यटनासाठी आवश्यक तेथे स्वच्छ आणि आरोग्यदायी ठिकाणे निर्माण करुन पर्यटकांमध्ये, सेवा पुरविणाऱ्यांमध्ये समन्वय साधून नव चेतना निर्माण करणे.

५. वैद्यकिय पर्यटकांकरीता आवश्यक असणाऱ्या विविध प्रकारच्या चांगल्या आरामदायी निवासाची व मूलभूत सोयी सुविधांच्या व्यवस्था करणे.

६. वैद्यकिय पर्यटकांना माहिती देणाऱ्या केंद्राची कार्यक्षमता वाढविण्यासाठी स्थानिकांनी त्याचबरोबर शासकिय स्तरावर प्रयत्न करणे गरजेचे आहे.

७. वैद्यकिय पर्यटकांना विविध प्रकारच्या रोगाची व त्या संदर्भातील वन उपचारांची माहिती देण्यासाठी जनसंपर्क सातत्याने नियोजनबध्द प्रयत्न करणे आवश्यक आहे.

८. जगातल्या विविध प्रकारच्या प्रसारमाध्यमांतून वैद्यकिय पर्यटना संदर्भातील प्रतिमा उंचावण्याचा प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

**वैद्यकिय पर्यटनातून होणारे फायदे :-**

भीमाशंकर **अभय अरण्यातून** पर्यटन करीत असतांना त्यांतून पुढील फायदे चांगल्या प्रकारे होऊ शकतील :-

१. स्थानिक पातळीवर विविध स्वरुपाची वैद्यकिय वनस्पती

उपलब्ध असून या वनस्पतीची जाण असणाऱ्या तज्ञ किंवा जाणकार व्यक्तीकडून त्यांची इत्यंभूत माहिती संकलीत करुन त्या संदर्भात स्थानिकांना त्यांची माहिती किंवा प्रशिक्षण दिल्यास, स्थानिकांना रोजगार उपलब्ध झाल्यास त्यांचे होणारे स्थलांतर थांबेल.

२. भीमाशंकरला येणारा पर्यटक हा धार्मिक दृष्टिकोणातून येत असतो. त्यावेळी त्याला वैद्यकिय स्वरुपाची माहिती पुरविली जाईल त्यावेळी पर्यटन करणारा पर्यटक त्यांच्या गरजा लक्षात घेवून व त्यांना योग्य सुविधा पुरविल्यास त्यातून होणारे आर्थिक प्राप्तीमुळे स्थानिकांना रोजगारांच्या संधी प्राप्त होतील.

३. शहरी भागातील लोक वैद्यकिय पर्यटनांच्या निमित्ताने ग्रामीण भागात येतील, अशावेळी पर्यटकांच्या गरजा किंवा मागणीनुसार ग्रामीण भागातील विविध पायाभूत सुविधांचा विकास होण्यास हातभार लागेल. जसे की पाणी, रस्ते, वीज, आरोग्य आणि दळणवळणसारख्या सोयी इ.

४. वैद्यकिय पर्यटनामुळे मोठया प्रमाणावर वनस्पतीचे संरक्षण व संवर्धन होऊन तेथील जैवविविधतेचे संवर्धन व समृध्दीही मोठया प्रमाणात होईल.

५. वैद्यकिय पर्यटनामुळे स्थानिकांना विविध प्रकारच्या पूरक व्यवसाय करण्यास मोठा वाव मिळेल, जसे की, औषधी वनस्पतीपासून औषधे बनविणे, पर्यटकांना मार्गदर्शन करणे, त्याचबरोबर इतरही पुरक व्यवसायाची निर्मिती होईल. कारण चांगल्या प्रजातीच्या पाळीव प्राण्याद्वारे दूध, अंडी, मांसे, फळे, भाज्या इत्यादी बाबी स्थानिक स्तरावरच उत्पादित केल्या तर पर्यटकांना उत्कृष्ट प्रतीचे जेवण उपलब्ध होईल आणि स्थानिकांना नगदी स्वरुपात उत्पन्न मिळेल.

६. स्थानिक तरुणांना वैद्यकिय पर्यटन क्षेत्रामुळे मोठया प्रमाणावर रोजगारांच्या संधी मिळू शकतात. त्यामुळे स्थानिक पातळीवर बेरोजगारीचा प्रश्न निकालात निघेल शिवाय तरुणांच्या नविन संकल्पना वापरुन या क्षेत्रांचा विकासही साधता येईल.

७. आर्थिक व सामाजिक विकासाला चालना वैद्यकिय पर्यटन क्षेत्रामुळे मिळेल, तसेच रोजगारांची व नोकरीची विविध साधने उपलब्ध झाल्यास मनुष्यबळाचा विकास साधता येईल.

**निष्कर्ष :-**

भीमाशंकर परिसरास अधिकृत पर्यटन स्थळांचा दर्जा देणे त्याचप्रमाणे वैद्यकिय पर्यटनांच्या सुविधांसाठी योग्य

निधी उपलब्ध करुन दयावा. पायाभूत सुविधा निर्माण करणे. उदा. पक्के रस्ते, वीज, पाणी इ. या परिसरातील मुळ रहिवासी आदिवासी जमातीतील काही तज्ञ किंवा जाणकार व्यक्तीकडून त्यांची इत्यंभूत माहिती संकलीत करुन वन औषधां संदर्भात व वापरा संदर्भात स्थानिक तरुण व्यक्तीस त्यांची माहिती किंवा प्रशिक्षण दिल्यास, स्थानिकांना रोजगार उपलब्ध होईल. रोजगारांचा प्रश्न स्थानिक पातळीवर सुटेल. वनांचे संरक्षण व संवर्धन होण्यास त्यामुळे हातभार लागेल.

* * *

संदर्भ :-


1. **Khatib K. A.:** Geography of Tourism Mehta Publication, Kolhapur.
2. **Kumar Manit (1992)** :- Tourism Today, Kanishka Publication Delhi 1992
3. **Kulkarni Sonali (2007 ):-** Tourism management in 21st Century, Book Enclave jaipur.
4. **Khatib K. A.** : Geography of Tourism, Mehta publication, Kolhapur.
5. **Pathan K. G. and V. S. Manganle (edi) (2004)** :- Sandarbha Maharashtra Vol-1 Intellectual Book Bureau Bhopal.
6. **Rai Vinay and R.S. Pawar, (2006) :-** Tourism its Development, Sonali Publication, New Delhi.
7. **Shinde S. B. (1997)** :- Geography of Tourism, Phadake Publication, Kolhapur.

८. **भोसले यशोधर (२००५) :-** प्रवासी पर्यटनाचे नवे पैलू, मेहता पब्लीशिंग हाऊस,पुणे

९. **डॉ. नागतोडे.** पर्यटन भूगोल .

१०. **डॉ. प्रकाश सावंत.** महाराष्ट्राचा भुगोल.

११. सकाळ वर्तमानपत्र

१२. **प्रा. निलेशा वानखेडे, प्रा. सुभाष रामराव रगडे (२०११)** :- पर्यटन व्यवसायातील आधुनिक संधी विशेष संदर्भ सिंधुदूर्ग जिल्हा, महाराष्ट्र भूगोलशास्त्र संशोधन पत्रिका खंड २८ अंक क्र. १ पान नंबर ५३ ते ५६

१३. **डॉ. विठ्ठल घारपुरे, (२००१):-** पर्यटन भुगोल, पिंपळापुरे अॅण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर

१४. **प्रा. के. ए. खतीब (२००६) :-** पर्यटन भुगोल, मेहता पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर.

१५. **प्रा. पांडुरंग पाटणकर (१९९८)** :- चला सहलीला, स्नेहल प्रकाशन, पुणे.

# आदिवासी मल्हारकोळी जमातीचे सामाजिक - सांस्कृतिक जीवन

* प्रा. डॉ. किरणकुमार कवठेकर

आदिवासी कोकणा, कातकरी, काथोडी, वारली, ठाकर, महादेव कोळी, मल्हार कोळी या जमाती सहयाद्री पर्वत रांगाच्या कुशीत वसलेल्या ठाणे जिल्हयात शतकानुशतके वास्तव्य करत आहेत. निसर्गाच्या सान्निध्यात पण दुर्गम - अतिदुर्गम अशा ठिकाणी या जमाती अतिशय हलाखीचे जीवन जगत आहेत. भूक, उपासमार व दारिद्रयाने गांजलेल्या या सर्व जमाती जंगल दऱ्यात रात्रदिवस भटकून फळे, कंदमुळे, डिंक, मध गोळा करुन त्याची विक्री करुन तर कधी सालगडी म्हणून कायमचे जमीनदार, सावकार, जंगल ठेकेदार व बांधकाम व्यावसायिक यांच्याकडे किंवा विटभट्टयावर रात्रदिवस संपुर्ण कुटुंबासह ढोर मेहनत करुन तुटपुंज्या मिळकतीवर आपली उपजिविका करतांना आढळतात. उद्याची चिंता न करता प्राप्त परिस्थितीत पोट कसे भरेल याचाच केवळ विचार करुन जगणाऱ्या व स्वतःला जंगलचे राजे म्हणवून घेणाऱ्या या जमाती स्वतःचा सामाजिक, सांस्कृतिक वारसा मात्र अव्याहतपणे पारंपारिक पध्दतीने जपताना दिसतात. वरील सर्व जमातीपैकी मल्हार कोळी जमातीचे सामाजिक - सांस्कृतिक जगणे कशा प्रकारचे आहे, याचा वेध घेण्याचा प्रयत्न मी जाणिवपुर्वक या लेखात केला आहे. कारण आजवर ठाणे जिल्हयातील इतर सर्वच जमातीवर संशोधनाच्या किंवा माहिती संकलनाच्या हेतूने काही एक प्रमाणात श्री. गोविंद गारे, महादेव अंधेर गुरुजी, डॉ. सरोजीनी बाबर, गोदावरी परुळेकर, कविता महाजन, बाळू नम यांनी लेखन केलेले दृष्टिस येते. पण या जमातीच्या बरोबरीने वास्तव्य करणारा मल्हार कोळी समाज मात्र ग्रांथिक स्वरुपात फारसा कुठे पहायला मिळत नाही. इतर जमातीप्रमाणेच या जमातीचेही सामाजिक सांस्कृतिक जीवन संदर्भ वैशिष्टयपुर्ण असूनही दुर्लक्षित आहेत. त्यामुळे सर्वांना त्यांच्या जीवन शैलीचा सामाजिक - सांस्कृतिक अंगाने परिचय व्हावा हा प्रधान हेतू नजरेसमोर ठेवून सदर लेख लिहिण्याचा अल्पसा प्रयत्न मी येथे केला आहे. सर्वप्रथम मल्हार कोळीच्या उत्पत्ती विषयी काही मतांचा विचार पुढील प्रमाणे करु या.

* प्राध्यापक मराठी विभाग, कला वाणिज्य महाविद्यालय, वाडा, जि. ठाणे

**मल्हार कोळी जमातीच्या उत्पत्ती विषयक काही मते :-**

कोणत्याही जाती - जमातीच्या सामाजिक- सांस्कृतिक किंवा इतर बाजू ज्ञात करुन घेताना सर्वाच्या मनात पहिला प्रश्न निर्माण होतो. तो म्हणजे त्या जाती जमातीची उत्पत्ती कशी व केव्हा झाली असावी ? सदर प्रश्नाच्या अनुषंगाने मल्हार कोळी समाजांच्या उत्पत्तीबाबत काही कार्यकर्ते व जाणकारांकडून माहिती मिळविली.पण त्यातून मल्हार कोळी समाजाच्या उत्पत्तीविषयक ठोस असे कोणतेच संदर्भ प्राप्त होत नाहीत. उत्पत्तीविषयक शोध घेतांना काही दंतकथा मात्र ऐकायला मिळाल्या.

मल्हारकोळी समाजातील कार्यकर्ते श्री. बाळकृष्ण गोऱ्हेकर असे सांगतात की, मल्हारकोळी हा पार्वतीचा पुत्र म्हणून ओळखला जातो. पार्वती देवी स्नान गृहामध्ये स्नान करित असतांना संजिवनी मंत्राचा जप करित असे. त्या स्नानगृहातून जे पाणी व अंगाचा मळ बाहेर येई ते एका ठिकाणी साचून राहत असे. दररोजच्या हया स्नान करतांना बोलल्या जाणाऱ्या मंत्रापासून त्या साचलेल्या मळात एक जीव निर्माण झाला. तो जीव म्हणजे मल्हार कोळी.

तर वाडा तालुक्यातील पोशेरी गावचे श्री. दत्तात्रय गायकर उत्पत्तीविषयी असे सांगतात की, डहाणू- तलासरी या परिसरात वारली या जमातीतील लोक अनेक वर्षापूर्वी वास्तव्य करत होते. त्या ठिकाणी राहणाऱ्या एक दोन व्यक्तीनी सरकारकडून कर्ज घेतले. त्याकाळी सरकारकडून त्यांना (तांदूळ, गहू, बाजरी वगैरे ) दिले जात असे. ते धान्याच्या स्वरुपातील कर्ज नंतर पैशाच्या रुपाने फेडावे लागत असे. त्या कर्जाची परतफेड त्या व्यक्तीना करता येत नसल्याने ते एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत होत असत. असे करत करत ते वाडा तालुक्यात आले. त्यांना कोणत्याही सरकारी माणसाने ओळखू नये म्हणून त्यांनी आपलं नांव, गाव व जात बदलून मल्हार कोळी असल्याचे सांगितले. अशा प्रकारे त्यांची जात मल्हार कोळी ही रुढ झाली. वाडा तालुक्यात जास्त प्रमाणात मल्हार कोळी लोक वास्तव्य करत आहेत.

मल्हार कोळी जमातीचे मूळ महादेव कोळी जमातीत आहे असाही एक मतप्रवाह पहायला मिळतो. महादेव कोळी जमातीचे मूळ वस्तीस्थान महादेव नांवाच्या डोंगरावर होते. तेथून ते महाराष्ट्रात आले. म्हणून या लोकांना महादेव कोळी असे संबोधले जाते. महादेव कोळी समाजामधूनच मल्हार कोळीची निर्मिती झालेली आहे. महादेव कोळीमध्ये फूट पडली आणि त्यातून मल्हार कोळीची निर्मिती झाली असे सांगितले जाते.

तर मराठी विश्वकोशात, हे मल्हारीचे भक्त असल्याने त्यांना हे नांव त्यांच्या पाणी भरण्याच्या कामावरुन पडले असावे. हे ठाणे, मुंबई व देशावर आढळतात. पंढरपुराजवळ पुष्कळ मल्हार कोळी येसकर (वेसकर) म्हणून आढळतात. अहमदनगर जिल्हयात बरेचजण शेती करतात. मराठीशाहीत सिंहगड,तोरणा व राजगड यांचे वंशपरंपरागत रक्षक (गडकरी ) हे कोळीच होते. ठाणे जिल्हयात अनेक मल्हार कोळी कुणब्यात समाविष्ठ झाले. अशी माहिती मल्हार

कोळीच्या उत्पत्तीविषयक मराठी विश्वकोश खंड ४ मध्ये नोंदवली आहे.

मल्हार कोळी जमातीच्या उत्पत्तीविषयक वरील सर्व मतांचा विचार केला तर मल्हार कोळीच्या उत्पत्तीविषयक पार्वतीच्या मळापासून मल्हार कोळीचा जन्म झाला ही बाळकृष्ण गोऱ्हेकर यांनी सांगितलेली उत्पत्ती आजच्या विज्ञान युगात न पटणारी आहे. पण डहाणू जवळ असलेली महालक्ष्मी देवी म्हणजे पार्वतीचाच अवतार असून तेथील मंदिराचे पुजारी सातवी हे पंरपरेने मल्हारकोळी जमातीचेच आहेत, असे वाडा येथील हरिश्चंद्र कोलेकर सांगतात. दत्तात्रय गायकर यांनी मल्हार कोळी हे मुळचे वारलीच असल्याबाबतची मांडलेली भुमिका न पटणारी आहे. कारण सरकारकडून धान्य स्वरुपात **तगाय** घेण्याची पध्दत इंग्रज काळापासून सुरु झाली असावी. त्यामुळे प्रश्न असा निर्माण होतो की , मल्हार कोळी जमात ही अलीकडच्या दोन तीन शतकात जन्मास आली आहे काय? तर मल्हारकोळीचे स्थलांतर झाले असल्यास ते आजतागायत चुकविण्याच्या हेतुने झालेले नसावे, उपजिविकेच्या हेतूने ते वाडा परिसरात आले असावेत असे वाटते. पण ठाणे जिल्हयातील आदिवासी समाजात मल्हार कोळी हे मुळचे वारली आहेत असाच विचारप्रवाह रुढ आहे. सदर समाजातील माजी आमदार महादेव गोपाळ कडू हे वारली व मल्हारकोळी पूर्वीपासूनच एकमेकांचे शेजारी म्हणून वास्तव्य करत असल्याचे सांगतात. एकमेकांच्या शेजारी वास्तव्य करत असतांना सामाजिक- सांस्कृतिक जीवन शैलीचे एकमेकांकडून बऱ्याच अंशी अनुकरण होत असते.हा समाजशास्त्रीयविचार मान्य केला तर वरील उत्पत्ती अभ्यासकांना विचार प्रवण बनविते. तर आज " मल्हारीचे भक्त ते मल्हार कोळी " ही विश्वकोशात नोंदविलेली उत्पत्ती प्रत्यक्षपणे अनुभवास येते. कारण अनेक मल्हार कोळी कुटुंबे जव्हार येथील व जेजुरीच्या खंडोबाला पुजताना दिसतात. "मल्हारी मार्तडाच्या आधारे खंडोबाची " उपासना महाराष्ट्रात बाराव्या शतकापासून अस्तित्वात असल्याचे दिसते. पण त्यापूर्वीही खंडोबाची उपासना असली पाहिजे असे अनुमान काढता येते. कारण खंडोबा हे दैवत क्षेत्रपाळ श्रेणीतले असून श्रेणीतील देवतांची उपासना प्राचीन काळापासून अस्तित्वात असल्याचे उल्लेख आढळतात. असे शरद व्यवहारे म्हणतात.

श्री. व्यवहारे यांची ही भूमिका स्वीकारली तर मल्हार कोळींची उत्पत्ती प्राचीन काळातच झाली असावी व ते जव्हारपासून डहाणू तलासरी या पर्यतच्या परिसराला कोळवण म्हणून संबोधले जाते. मल्हारी मार्तडावर श्रध्दा भाव प्रकट करत असल्यानेच त्यांना मल्हार कोळी हे नामाभिधान प्राप्त झाले असावे असे वाटते.

**मल्हार कोळीची सामाजिक स्थिती :-**

सदर समाज आपला सामाजिक- सांस्कृतिक वारसा अव्याहतपणे जतन करुन पारंपारिक पध्दतीने जीवन जगतांना आढळतो. ठाणे जिल्हयाबरोबरच महाराष्ट्राच्या अन्य भागातही उपजिविकेच्या निमित्ताने वास्तव्य करणाऱ्या या जमातीची लोकसंख्या १९९१

च्या जनगणनेनुसार आदिवासी उपयोजना २००६-०७ या महाराष्ट्र शासनाच्या माहिती पुस्तिकेत नोंदविल्यानुसार २०६७४१ इतकी होती. तर आज रोजी अंदाजे चार ते पाच लाखाच्या जवळपास लोकसंख्या असणारा हा समाज कष्टाळू, प्रामाणिक पण तितकाच दैववादी, अंधश्रध्दाळू व मद्य सेवन करणारा आहे. वीस पंचवीस घरांच्या समुहाने राहणारा, एकत्र कुटुंब पध्दतीचा आदर करणारा, घरच्या प्रमुख कर्त्या पुरुषाला मान देणारा, त्याच्या निर्णयाचा पण सर्व संमतीने आदर करणारा हा समाज आहे. त्याचबरोबर सण-समारंभ प्रसंगी किंवा सांस्कृतिक कार्यक्रमांच्या निमित्तीने स्त्रियांनाही हा समाज मानाचे स्थान देणारा आहे. मल्हार कोळी समाजातील पुरुष अजूनही लंगोटी लावतात. बाहेरगावी जाताना मात्र ऐपतीप्रमाणे बाराबंदिची व कमरेला एक ते दीड मीटरचा पांढरा किंवा रंगीत तिरकस बांधतात तर स्त्रिया नऊवारी पण भडक रंगाचे लुगडे नेसतात. पण लुगडे नेसताना वारली स्त्रियाप्रमाणे गजरा माळतात. पायात पैजण व जोडवी, दंडावर चांदीचा वेळा किंवा चुलबंदी व ऐपतीनुसार गळयात सोन्याच्या पुतळया किंवा चांदीची पुतळी घालतात. आजही युवा पिढी मात्र नागरी समाजाच्या, दुरदर्शनच्या व चित्रपटांच्या प्रभावाने पॅन्ट, शर्ट, सलवार, कुडता व सहावारी रंगीत साडया परिधान करतांना दिसतात. शेती हा मुख्य व्यवसाय करणारा समाज भात, नागली, वरी, खूरासणी, हुलवाल-हुलगा आदी पिके घेतांना दिसतो. वरींची आंबील त्यांना जास्त आवडते. शेतीव्यवसायाबरोबरच मासेमारी व शिकार करणे हे त्यांचे आवडीचे छंद आहेत. ससे, डुक्कर, सांबर, मोर यांची ते सामुहिकपणे शिकार करतात. वाघ, सिंह, कावळा, कोकीळ, पोपट, साळुंकी यांची मात्र ते शिकार करत नाहीत. शिवाय त्यांचे मांसही खात नाहीत असे आढळते. घरे कमी उंचीची, चौपाखी असतात. गायी, म्हशी, शेळया व कोंबडया हे त्यांचे पाळीव पशू-पक्षी आहेत. शासनाच्या घरकुल योजनेमुळे आज काही कुटुंबे पक्क्या विटांनी बांधलेल्या कौलारु घरात राहत आहेत. त्यांची भाषा वारलीप्रमाणेच असून शिक्षणाच्या प्रभावाने व आदिवासी इतर समाजाच्या संपर्काने आजची तरुण पिढी मराठी भाषेतूनच सर्व व्यवहार करतांना आढळते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे परंपरा आणि नवता यांचा त्यांच्या जीवनात आज संगम होताना पहायला मिळतो. असे असले तरी त्यांनी आपला सांस्कृतिक वारसा मात्र पारंपारिक पध्दतीने जतन केला आहे. त्यांची खरी ओळख आपल्याला त्यांच्या सांस्कृतिक प्रथा-परंपराच्या अवलोकनातूनच होते. त्याकरीता त्यांच्या सांस्कृतिक जीवनाचा वेध पुढीलप्रमाणे घेऊ या .

**मल्हार कोळींचे सांस्कृतिक जीवन :-**

हा समाज आर्थिकदृष्टया गांजलेला असला, हालीखीचे जीवन जगत असला तरीही आपली सांस्कृतिक जीवनमुल्ये प्राणपणाने जपणारा आहे. विविध सण-समारंभ, देव-देवतांचे पूजन, लग्न समारंभ, लोकनृत्ये, लोकगीते, लोककथा, दैवतकथा, दैवतगीते, सणावारांची गाणी, मनोरंजनपर गाणी, कोडी, म्हणी, उखाणे यातून त्यांचे सांस्कृतिक वैभव पहाणाऱ्यांना प्रभावित

करते. वेगळेपणाची जाणीव निर्माण करुन देते. येथे प्रथमतः त्यांच्या देवी-देवता कोणत्या आहेत ते पाहू.

**मल्हार कोळींची देवी-देवता :-**

सदर समाजात कुलदेवता, ग्रामदेवता व आराध्य दैवते असे तीन स्तर आढळतात. त्यापैकी हिरवा,हिमाय, कनसऱ्याबाला, बैलाचा तांडा, नारान देव, बहिरमदेव, बहिरी भवानी, फडाचा देव, महादेव, खंडेराय, चित्ता, झोटिंग ही त्यांची कुलदैवते होत. तर गाव-शिवारी (गावदेवी), तोरणी चेडा, मखरी चेडा, गावाचे मेठकरी, रानशिवारी (वाघोबा) हया त्यांच्या ग्रामदेवता आहेत. आराध्य दैवते म्हणून ते चांदसूर्या, हातोबा, भिळोबा, वीर, गवळी चेडा सवत्या, वाया गवला इत्यादीना पूजतात. या सर्व देवी देवतांचे सण सणसमारंभ प्रसंगी, शेतीची कामे करताना, सर्पदंश झाल्यास रोगराई पसरल्यास, नैसर्गिक आपत्ती कोसळल्यास भूतबांधाच्या भितीपोटी किंवा काहीही वाईट होऊ नये, घरादारांचे, गुरा-ढोरांचे व संपूर्ण गावाचे रक्षण व्हावे या हेतूने वैयक्तिक व सामुहिकपणे भगताच्याद्वारे पूजन केले जाते. भगत सांगेल त्याप्रमाणे आचरण केले जाते.

**सण-समारंभ :-**

मल्हार कोळी समाज सणांना खूपच महत्व देतो. गौरी- गणपती, नागपंचमी, दसरा, दिवाळी, संक्रांत, होळी या सणांबरोबरच कोली भाजीचा सण, नवाभात खाणेचा सण, साकर चवूत, पितर बारस, पितरा, गावदेवीची साथ, गहिबीज हे स्वतःच्या समाजाचे खास असे पांरपारिक सणही साजरे करतो. पण हे सर्व सण करण्याची त्यांची पध्दत इतरांच्या तुलनेत आगळया स्वरुपाची व वैशिष्टयपूर्ण आहे. सर्वच सण साजरे करताना त्यांच्या आनंदाला उधाण आलेले असते. आर्थिक परिस्थिती चांगली नसतांनाही सण समारंभ प्रसंगी कर्ज काढून ते उत्साहने साजरे करतात. यातून ते सणांना स्वतःच्या जीवनात किती महत्व देतात, याची कल्पना येते. त्यांच्या या सणांचे स्वरुप पुढील प्रमाणे आहे.

**कोली भाजीचा सण :-**

हा सण जेष्ठ महिन्यातील कोणत्यातरी एका मंगळवारी साजरा करतात.पाऊस पडल्यानंतर शेतात किंवा जंगलात कांद्याच्या पातीसारखी भाजी उगवते तिला "कोली भाजी "म्हणतात. सदर भाजी थोडी फार उंच झाली की गावकरी एकत्र येऊन वर्गणी जमा करतात. निश्चित केलेल्या मंगळवारी वाघोबा देवाच्या स्थानाजवळ सर्वजण एकत्र जमून गावाच्या भगतांकडून देवाला शेंदूर लावतात आणि कोलीभाजी देवापुढे ठेवतात. नारळ फोडून, कोंबडा किंवा बकऱ्याचा बळी देऊन, दारुची धार देवापुढे सोडून देवाला प्रार्थना करतात. "हे गांवदेवी, वाघोबादेवा चार महिन्यांची रात आलेली आहे.आमची पोरटोरं, गुरुढोरं, किडयाकाटयात फिरतील ती तुझ्या ताब्यात ठेव. शेतात चांगल पिक येऊ दे. रोगराईपासून गावाचं रक्षण कर. तुला येत्या मगशिराला (मार्गशीर्ष महिना) साथ भरुन तुझा नवस फेडू."असे सांगून सर्व गावकरी खोबरे व कोंबडया-बकऱ्यांचे मांस प्रसाद म्हणून वाटून खातात. त्याचबरोबर गावातील व पाडया-पाडयातील सर्व लोक आपआपल्या

कुलदैवतांना दिवा लावून, शेतावरील देवाला शेंदूर लावून कुटुंबातील सर्वजण एकत्र बसून कोलीभाजी खातात. कोलीभाजीचा सण कौटुंबिक पध्दतीने साजरा करतांनामात्र कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्ती सर्वाच्या हातावर कोलीभाजी देऊन सर्वाना उद्देशून म्हणते, " चार महिण्याची रात आलेली आहे. कोणी भांडण-तंटा करु नका. शेतीची चांगली लागवड करा. सुख दु:खाला एकमेकांना मदत करा. असे समाजून आथा सगली जना कोली खा ", असे ती ज्येष्ठ व्यक्ती सर्वाकडून अपेक्षा व्यक्त करुन कोली भाजी खायला सांगते. ज्येष्ठ व्यक्तीकडून कोलीभाजी खाण्याचा आदेश मिळताच स्त्रिया सर्वाच्या पाया पडतात. एकमेकांना भेटतात आणि सर्वजण एकत्रपणे कोलीभाजी खातात. वयस्कर, पुरुष- स्त्रिया दारु पितात, एकत्र बसून जेवतात. या दिवसापासूनच कामडी नृत्यास ते प्रारंभ करतात. या सणासाठी नवीन जावयाला व मुलीला खास करुन आमंत्रण दिले जाते.

**नागपंचमी :-**

श्रावण महिन्यातील हा सण मल्हारकोळी मोठया श्रध्देने साजरा करतात. या दिवशी शेतात नांगरणीचे काम केले जात नाही. सदर दिवशी उपवास करुन पुरुष नागाच्या बिळाजवळ जाऊन दूध व ज्वारीच्या लाहया वाहून पूजा करतात. महिला आणि कुमारिका रात्री घरी पाटावर तीळ, तांदूळ, उडीद यापासून बनविलेले नऊ नाग ठेवतात. गोडेतेलाचा दिवा लावतात. तेरडा,गोमेठी, करंटोळ, शिरोळी अशा वेलीची फुले, ज्वारीची फुले (लाहया) व दुध वाहून नागदेवाची पुजा करतात. उपवास करणाऱ्या स्त्रिया घरोघरी जाऊन एकमेकांना भेटतात. मोठयांचे आशीर्वाद घेतात व आपल्याकडील ज्वारीची फुले (लाहया) त्यांना देतात. सदर दिवशी बहीण भावाकरिता उपवास करते. बहिण-भाऊ एकमेकांना आर्वजून भेटतात. रात्री जेवण झाल्यावर सर्वजण मोकळया जागेत येऊन पायात घुंगरु बांधून ढोलकीच्या तालावर गौरीनृत्य सादर करतात.

**नवखाणे (नवा भात खाणेचा सण):-**

हा सण या परिसरातील सर्वच आदिवासी साजरा करतात. भाद्रपद महिन्यात शेतात तयार होणारा भात याच महिन्यातील एखाद्या मंगळवारी किंवा सोयीच्या दिवशी कापून घरी आणतात. सायंकाळी त्या भाताचे पोहे करुन, आळूचे देठ, माठ, डांगर, मासे, खेकडे यांची भाजी करुन हिरवा देवाला दिवा लावून घरातील सर्वजण एकत्र बसतात. वडीलधारी माणूस ताटात पोहे घेऊन ते सर्वाना वाटतो. पोहयांचे वाटप झाल्यानंतर सर्वाना पुरले की नाही असे विचारतो. जमलेले सर्वजण हो पुरले असे सांगतात. तेव्हा तो सर्वाना म्हणतो, आपल्या कष्टाची नवी कणसरी आथा सगली जना खा नवा भात (पोहे) खाण्याचा वडीलधाऱ्या व्यक्तीकडून अशा प्रकारे आदेश मिळाल्यानंतर सर्वजन एकमेकांना भेटतात. वडीलधाऱ्या माणसांच्या पाया पडतात. नवा भात (पोहे) खातांना मात्र ज्येष्ठ मंडळी नवभाजीचा चाखणा खात खात दारु पितात. जेवण झाल्यानंतर कामडी किंवा तारपा नाच

करुन या सणाचा अशाप्रकारे आनंद उपभोगतात.

**गवरीचा (गौरी) सण :-**

भाद्रपद शुध्द सप्तमीला हा सण साजरा केला जातो. या सणाला **गवरी चालवणे** असेही म्हणतात. सणाच्या दिवशी लग्न झालेल्या स्त्रिया उपवास करतात. प्रत्येक घरातील पुरुष सकाळी जंगलात जाऊन इंदई (इंदवी) किंवा कलई नावाच्या वेलीची डहाळी (फुलांसह) मोरीडेणा (दिंडा) वनस्पतीच्या पानात गुंडाळून घराशेजारी आणून ठेवतो. सायंकाळी चारच्या सुमारास दोघेही पती-पत्नी आंघोळ करुन स्वच्छ कपडे घालतात. पुरुष डोक्याला पगडी प्रमाणे कापड बांधून किंवा टोपी घालून घराजवळ आणून ठेवलेली गौर (म्हणजे इंदई किंवा कलई वेलीची फुलांसह आणलेली डहाळी ) घेऊन येतो. आणि घरासमोरील वळचणीत उभा राहतो. त्याची बायको डोक्यावर पदर घेऊन हातात पंचारती घेते आणि पूर्वेला तोंड करुन आराध्यदैवत चांद-सूर्याला व पश्चिमेकडे तोंड करुन साळा समिदरांना ओवाळते. नंतर डोईवरला पदर काढून त्याची ओटी करुन पतीने आणलेली गौरी ओटीस घेते, नवऱ्याच्या कपाळी शेंदूराचा टिळा लावून त्याच्या पाया पडते. नवराही पत्नीच्या कपाळी शेंदूर व कुंकवाचा टिळा लावतो. पत्नी गौरीला सुपात ठेऊन बाजूला तांदळावर दिवा लावते आणि अबीर, गुलाल, शेंदूर, कुंकू वेगवेगळे गोडेतेलात कालवून घेते. नव्या भाताच्या तांदळांचे उखळात कुटून तयार केलेले पीठ (त्याला धापट असे म्हणतात) ताटात घेऊन त्यावर पाणी टाकून ती कालवून घेते. तांबडया मातीचे पट्टे पायरीपासून प्रत्येक खोलीत, कणग्याजवळ, गोठयात व चुलीपर्यत तयार करुन त्यावर हाताच्या मुठीची गौरी पावले तयार करते. त्यांना अबीर, गुलाल, शेंदूर यांची बोटे लावून गौरी घरात आल्याची निशाणी करते. चुलीजवळ,कुडावर लाल मातीने रंगवलेल्या ठिकाणी गौरीचे चित्र पिठाने काढून पाटावर लहान मडके किंवा तांब्यामध्ये गौरीची फुले ठेऊन, गौरीची स्थापना केली जाते. पाटावर बाजूला दिवा लावला जातो. तांब्यावर नारळ ठेऊन कळसही भरला जातो. अशा प्रकारे गौरीची पूजा करुन एक इंदई फुल नवऱ्याच्या कानावर खोचून पाया पडते, गौरीला नैवेद्य ठेवते. त्याला बोना ठेवणे, असेही म्हणतात. घरातील व शेजारच्या वडीलधाऱ्या माणसांना नमस्कार करुन, समवयस्कांना भेटून झाल्यानंतर एकत्र जेवण करतात. अष्टमीच्या दिवशी गौरीचा मोठा सण असतो. त्या दिवशी मटण, गोडया पाण्यातील मासे, चिंबोरी (खेकडे) आणि तांदळाच्या भाकरी सोबत दारु अशी मेजवानी असते. सदर प्रसंगीही गौरीनाच करतात. नवमीच्या दिवशीही शिळा सण म्हणून गौरी नाच करुन हा सण साजरा केला जातो. सांयकाळी भाताच्या शेतात गौरीच्या फांदीही (गौरी मातेची ) पूजा व आरती करुन विसर्जन केले जाते.

**साकर चबूत :-**

भाद्रपद महिन्यातील हा तिसरा सण. साकर चबूत हा एक प्रकारचा उत्सवच असतो पण तो सर्वजण साजरा करत नाहीत. बहुतेक स्त्रिया या देवतांच्या भक्त असतात. त्या भाद्रपद महिन्याचा काळोखी चवथीच्या

दिवशी उपवास करुन गावात जोगवा मागतात. रात्री घरासमोरील अंगणात तुळशीचे रोपटे लावून, सभोवताली शेणाने सारवून तुळशीभोवती छोटीशी मंडवली (छोटासा मंडप) उभारुन त्याला रान फुलांचे हार घालतात. चंद्रोदय होताच पुजारी (भगत) पूजेला सुरुवात करतात. हे दैवत नवसाला पावणारे असल्याने आदल्या वर्षी घेतलेला नवस पूर्ण झाल्यावर पाच नारळ, केळी, काकडी, इतर फळे, साखर अशी नवसाची तळी वाहतात. तर काहीजण या दिवशी नवीन नवस बोलतात. कुणाला मुल-बाळ होत नसेल, गायी, म्हैशी, बकरी यांना पिल्ल होत नसतील किंवा काहीची रोगराई बरी होत नसेल तर मोठया श्रध्देने ते नवस बोलतात. गाय, म्हैस, बकरी यांच्याकरीता बोललेला नवस पूर्ण झाला तर नवस बोलणाऱ्या व्यक्तीला स्वतःच्या गळयात जनावरांचे दावे बांधून जोगवा मागावा लागतो. पूजा आटोपल्यानंतर नारळ फोडून त्यात साखर घालून केलेला हा प्रसाद सर्वजण वाटून खातात. जमलेली सर्व मंडळी रात्रीचे जेवण एकत्र करतात. या सणाला मात्र दैवतांकरिता दारु, ताडी, कोंबडा, बकरी वाहिली जात नाहीत. पण रात्रभर गौरीचा नाच किंवा तारपा नृत्य आवर्जून केले जाते. ही पूजा म्हणजे सावित्री आणि यम यांची पूजा असेही मानतात. गौरीचा नाच करतांना एकमेकांना कोडीही घालतात. सुपभर लाहया त्यात एक रुपाया (उत्तर - आकाशातील चंद्र तारे ) वाकी तीकी कुहू बायतीन डोकी दहा पाय (उत्तर - नांगर हाकणारा शेतकरी व दोन बैल) अशी अनेक कोडी घालून एकमेकांचे मनोरंजन करतात.

**पितर बारस :-**

हा उत्सव भाद्रपद महिन्यातील काळोखी बारसीला (आमावस्येच्या रात्री) साजरा केला जातो. हा उत्सव म्हणजे कुलदैवतांचे वार्षिक पूजन, या दिवशी कुलदैवतांची स्थापना ज्यांच्या घरी केलेली असते किंवा कुलदैवते असलेल्या स्थानाची पूजारी म्हणून देखरेख करणाऱ्यांच्या हस्ते कुलदैवतांचे पूजन केले जाते. रात्री कुलदैवतांच्या जागर भरविला जातो. ढोल, ताशा वाजवून कुलदैवतांची गाणी गावून हा कार्यक्रम साजरा करतात.

**पितरा :-**

हा सण भादव्यातील आमावस्येच्या (म्हणजे भाद्रपद महिन्यातील अमावस्या) दिवशी साजरा केला जातो. या सणास वडीलांना घास घालणे असेही म्हणतात. सणाच्या दिवशी दुपारी घरचा पुरुष एका सुपात किंवा द्रोणात किंवा पत्रावळीवर भात, भाकरी व पाच भाज्या एकत्रित करुन बनविलेली भाजी, गोड भाकरी, पुरी वगैरे व वडील व्यक्ती (पितर) दारु वगैरे पित असतील तर ती सुध्दा छोटया वाटीत घेऊन नैवैद्यासोबत ठेवली जाते. असा नैवेद्य मृत आई-वडीलांच्या, आजी-आजोबाच्या नावे घरावर ठेवला जातो. त्यावर पाणी सोडून काव काव ये, असे तीन वेळा उच्चारल्यानंतर तो नैवेद्य कावळयांनी खावा अशी सर्वाची अपेक्षा असते. कावळयाने नैवेद्य खाल्यानंतर घरची मंडळी आनंदाने भोजन करतात.

जेवण आटोपल्यानंतर दुपारी ढोलनृत्य करतात. अर्थात संध्याकाळीही सदर नृत्य केले जाते. दुसऱ्या दिवशी कर असते. त्या दिवशी शेतीची कामे केली जात नाहीत.त्याचबरोबर कोणी शेतात कामालाही जात नाहीत. पाडयातील सर्व मंडळी या सणाचा आनंद लुटतात.

**दसरा :-**

या दिवशी गावदेवी आणि कुलदेवी यांची पारंपारिक पध्दतीने पूजा केली जाते. आस महिन्याचे एकमच्या (आश्विन महिन्याच्या पहिल्या दिवशी ) दिवशी पोलीस पाटील, गावातील ज्येष्ठ व्यक्ती व तरुण मंडळीना सोबत घेऊन वाघोबांचे देऊळ किंवा गावदेवीचे चिरे जेथे ठेवलेले असतात तेथे जातो. अठरा प्रकारची धान्ये पेरुन, तांब्यावर नारळ ठेऊन कलश भरला जातो. बांबूच्या कांब्यांची एक चौकडी ताटी बनवून त्याला दर दिवशी खुरासणीच्या फुलांची माळ बांधली जाते. बाजूला थोडेसे तांदूळ पसरुन त्यावर पणती लावतात. धूप करुन अगरबत्ती लावून ढोल वाजवून देवाला आमंत्रित करतात. भगतांच्या अंगात देवाचे वारे आले की त्यांच्याकडून जाणकार मंडळी गावाच्या सुख-दुखाचे कौल घेतात. त्यावेळी काही कुटुंबे हिरवा, हिमाय, फडाची देवी, बहिरी भवानी, महालक्ष्मी या कुलदैवतांचेही धान्य पेरुन पूजन करतात. ढोल वाजवून देवांना आमंत्रित करतात. चौथ्या रात्री फुलोरा (म्हणजे चाप्यांची फुले किंवा फुलांची माळ घालणे ) आणि पाचव्या रात्री जागरण केले जाते.या दिवशी म्हशादेवाचे वारे अंगात घेऊन तलावातील कमळाची फुले देवाच्या पूजेला घेऊन येतात. सदर वेळी झुननारे नवीन भाये (म्हणजे झुलणाऱ्याकडून अंगात देवाचे वारे घेऊन झुलायचे कसे याचे शिक्षण घेणारे नवतरुण, त्यांना वारकरी असेही म्हणतात.) तयार केले जातात. नवव्या किंवा दहाव्या दिवशी धान्याचे व गावदेवीचे पूजन केले जाते. देवीला नारळ, काकडी, वाहून कोंबडया - बकऱ्यांचा बळी देऊन दारुची धार सोडली जाते तेथे जमलेली सर्व मंडळी कोंबडया - बकऱ्यांचे मांस प्रसाद म्हणून शिजवून खातात. त्यानंतर सर्वच कुटुंबे आपआपल्या घरी देवाचे पूजन करुन हा सण साजरा करतात.

**दिवाल बारस ते दिवाळी :-**

हा सण आश्विन महिन्यातील काळोखी बारसीपासून (आमावस्येपासून) कार्तिक महिन्यातील चांदणी बीजापर्यत साजरा केला जातो. हिरवा, हिमाय, झोटींग, बहिरम या कुलदैवतांची वार्षिक पूजा पितर बारस किंवा दसऱ्याला झाली नसेल तर दिवाल बारसीला करतात. त्यावेळी देव ठेवण्याची सलद (बांबूच्या कांब्यापासून बनविलेली टोपली) शेणाने सारवली जाते. देवांना गोमुत्र, दुध व पाण्याने आंघोळ घातली जाते. ढोल वाजवून देवांना आमंत्रित केले जाते. भगतांच्या अंगात देवाचे वारे आले की, घरातील स्त्रि देवांची व कुटुंबातील सदस्य कामधंद्यासाठी किंवा कायमचे स्थलांतरीत

झालेले असतात. पण या सणाला आलेले असतात त्या सर्वाची (त्यांना भोपी असे म्हणतात) आरती करते. देवाचे वारे अंगात घेवून घुमणाऱ्या व्यक्तीकडून म्हणजेच देवांकडून (घुमणाऱ्या व्यक्तीना देव म्हणून

संबोधतात) सुखसमाधानाकरिता कौल घेतला जातो.नारळ, वालूक,चवळी,करांदे, पळसाच्या पानात बनविलेल्या पानमोळया (पानोळया) यांचा देवाला नैवेद्य दाखवून कोंबडयांचा बळी दिला जातो. सलदीतील नवा तांदूळ भरुन (याला वेष भरणे असे म्हणतात.) त्यावर देव ठेऊन माळयावर किंवा माचीवर ती सलद ठेवली जाते. नंतर देवास दाखविलेला नैवेद्य प्रसाद म्हणून सर्वांना वाटतात.

बारसीपासून दररोज रात्री ढोल नाच करतात. चौदसीच्या दिवसाला बारकी टिवली बे-हा असे म्हणतात. हया दिवशी दरवाज्याच्या दोन्ही बाजूस शेणाचा गोळा थापून त्यात गोल खड्डा करतात. अशा पध्दतीने सर्व दारावर गोळे ठेवले जातात. आमावस्येच्या दिवशीही टिवळयांचा दिवा (टिवला म्हणजे अंडयांच्या आकाराचे चिराड फळ ते वाळलेले फळ मध्यभागी आडवे कापून त्यातील बिया व गारे काढून त्याचा दिवा बनवितात.) लावला जातो. लहान - थोर मंडळी फटाके वाजवून दिवाळीच्या सणाची सुरुवात करतात. बळीपाडवा हा दिवाळीचा मोठा सण.त्या दिवशी सकाळी पुरुष मंडळी लवकर उठतात.गायी, बैल, म्हशी, वासरे यांच्या शिंगाला गेरु लावून त्याच्या अंगावर गैरुनेच हाताचे पंजे उमटवतात. खवस आणि कहाडोळीच्या झाडाची चौरे करुन (म्हणजे खवस आणि कहाडोळीच्या झाडांची फांदी वाक बनविल्याप्रमाणे ठेचून त्या फांदीचा काही भाग तसाच ठेवतात.) जनावरांच्या शिंगांना खोचतात.गोठयासमोर रिकाम्या जागेत चौक भरुन त्यावर आडवे मुसळ ठेवतात. नंतर रस्त्यावर भाताचा पेंढा (पेंडी ) पेटवतात. पेटलेल्या पेंढयावरुन गावातील सर्व जनावरे एकाच वेळी उधळवतात. जनावरे पेंढयावरुन उधळावीत म्हणून मागून ढोल किंवा पत्र्याचा डबा वाजवितात. पेटलेल्या पेंढयावरुन सर्व जनावरे गेल्यानंतर तेथे उपस्थित असलेली सर्व माणसेही पलीकडच्या बाजूस उडी मारुन जातात आणि जळलेल्या पेंढयाची राख कपाळाला बळीचे भस्म म्हणून लावतात. या दिवशी चवळी, करांदे (गोड कंदमुळ) उकडून सर्वजण एका मोठया घरात जमून चवळीचा नैवेद्य कुलदैवतास दाखवितात. त्यांनंतर जमलेल्यांपैकी एकजण उकडलेली नवी चवळी (नव्याने पिकलेली) करांदा व पानमोडी (तांदळाचे पिठ पळसाच्या पानांत भरुन केलेली भाकरी ) घेऊन सर्वांच्या हातावर ठेवतो उपस्थित सर्वजण पुरुष मंडळी एकमेकांना चवळीचा घास भरवून हा सण साजरा करतात.

**गावदेवीची साथ :-**

हा गावक-यांचा सार्वजनिक सण. गावचा पाटील व गावातील ज्येष्ठ जाणकार माणसं मगशीर(मार्गशीर्ष) महिन्याच्या सुरुवातीला एकत्र जमून गावदेवीची साथ कोणत्या मंगळवारी करायची व अंदाजे खर्च किती येईल याची चर्चा करुन वर्गणी निश्चित करतात. सर्वानुमते ठरविलेल्या मंगळवारच्या आदल्या दिवसाच्या रात्री गावदेव वाघोबाच्या देवस्थानाजवळ जागरण केले जाते. त्यावेळी ढोल व डाक (डमरुच्या आकाराचे पण थोडे मोठे वाद्य) ही पारंपारिक वाद्ये वाजवनू गावचा भगत देवाच्या कथा रात्रभर सांगतो. सकाळी गावदेव वाघोबा, तोरणीचेडा, मखरीचेडा आणि इतर चेडे यांना शेंदूर लावतात.

गावातील जाणकार व्यक्तीच्या अंगात या देवांचे वारे येते. कोळी भाजीच्या सणाला कबुल केलेले नवस या सणाला फेडले जातात. नारळ फोडून कोंबडया बक-यांचा बळी देवून पाटी व वयस्कर मंडळी देवाला उद्देशून म्हणतात की, " जेष्ठ महिन्यात तुला बोलल्याप्रमाणे आज तुझा नवस गावक-यांनी फेडलेला आहे. यापुढेही आमच्या पोरा बाळांना, गुराढोरांना सुखात ठेव. आणि अशीच कृपादृष्टी गावावर असे दे.

पूर्वी दर दहा वर्षानंतर एकदा संपूर्ण गाव गुराढोरासह ओस ठेवले जात असे. गावातील कोणत्याही लहान थोर व्यक्तीना आजारपण येणार नाही याची खबरदारीही घेतली जात असे हा नियम मोडणाऱ्या व्यक्तीस गावकरी दंड ठोठावत असत. अशा रितीने हा सण गावकरी पारंपारिक पध्दतीने साजरा करत असत.

**सकरात (संक्रांत) :-**

जे शेतकरी आपल्या शेतात तीळ पिकवितात, ते पिकविलेले नवीन तीळ संक्रांतीपूर्वी खात नाहीत. या सणाला गुळ घालून तिळाचे लाडू बनवितात. कुलदैवतेला दिवा लावून तिळाचा नैवेद्य दाखवितात. नंतर सर्व मंडळी एकमेकांना तीळगुळ वाटतात. आपला तीळ सांडू नाका, आपआपसात भांडू नका, असे म्हणून सर्वजन तीळ खातात, घरातील वयस्कर माणसं दारु, ताडी पिऊन जेवण करतात. संक्रांतीच्या दुसऱ्या दिवशी कर असते. सदर दिवशी कोणीही कामाला जात नाहीत, करीचा आनंद लुटतात.

**गाहिबीज :-**

हा सण म्हणजे नाराणदेवाचा वार्षिकोत्सव असतो, माही महिन्यातील (माघ महिन्यातील) चांदणी बीज किंवा माहि महिन्यातील पहिल्या मंगळवारी हा उत्सव साजरा केला जातो. त्या दिवशी नारायणदेवाची सलद, सलद ज्यांच्या घरी असते ते घर, घरासमेरील अंगण शेणाने स्वच्छ सारविले जाते. घरमालक व त्याची पत्नी दोघेही त्या दिवशी उपवास करतात, सर्व लहान थोर मंडळी सायंकाळी उत्सवाच्या ठिकाणी एकत्र जमतात.रात्री आठच्या सुमारास नाराणदेवाची सलद अंगणात आणतात. अंगणात गाईच्या तुपाचा किंवा तिळाच्या तैलाचा दिवा लावून धूप करुन देवाच्या उत्सवास प्रारंभ करतात. नाराणदेवाचा कामडी भगत काठी, टाळ वाजवून देवांची कथा गातो. त्याला कांबडणी ( कांबडी, नृत्य करणाऱ्या स्त्रिया) साथ देतात. कांबडी भगत गावाच्या सर्व देवांना व सूर्य, चंद्र,ढग, सुकेसर, पाऊस, वारा, समुद्र, शेषनाग इत्यादी देवांना या उत्सवात सहभागी होण्याकरिता आमंत्रित करीत असतो. झुने भगताच्या अंगात देवाचे वारे आल्यावर जाणकार मंडळी देवाकडून कौल घेतात. यानंतर रात्रभर कांबड नाच केला जातो. काबडाची सोंगे घेऊन रात्र जागविली जाते. दुस-या दिवशी सकाळी भगताच्या अंगात देवाचे वारे आल्यानंतर कुटुंबप्रमुख देवाची पूजा करतो. त्याला कोंबडया बक-यांचा बळी व दारुची धार देतो. त्यानंतर वर्षभरात ज्यांनी दुःखद अथवा संकट समयी देवाला बोललेला नवस फेडतात. नारायणदेव हा दुःखद प्रसंगी अथवा

संकटकाळी पावणारा देव म्हणूनच प्रसिध्द आहे. या देवाची बहुतेक ठिकाणी नारळाने पूजा करित नाहीत. देवाला शेंदूर लावून सलदीत नवा तांदूळ भरुन त्यात ठेवतात.

देवाला बळी दिलेल्या कोंबडया - बकऱ्यांचे मांस शिजवून दुपारचे जेवण करतात. या महिबीज उत्सवापासूनच नागली, वरी, ज्वारी यांची पीठ खाण्यासाठी शिजवितात.

**माघी होळी :-**

हा सण संपूर्ण माघ महिना आणि शिमगा महिन्याच्या (फाल्गुन महिन्याच्या ) तेरा दिवस अशा मोठया कालावधीत साजरा केला जातो. या काळात रात्रीच्या वेळी गावागावात व प्रत्येक पाडयातील मुली एकत्र जमून होळीची गाणी गातात, तर मुले होळीची फाकी (अश्लिल गाणि किंवा गोष्टी ) सांगून आरोळया देतात. मुलं- मुली एकमेकांना पाण्याने भिजवतात. असा हा कार्यक्रम महिनाभर चालत असतो. शिमगा महिन्यातील (फाल्गुन महिन्यातील) चौदाव्या दिवशी छोटी होळी आणि पुनवेला गावाची एकत्र मोठी होळी असते. होळीचे पूजन करण्याचा मान गावच्या पाटील-पाटलीणीला किंवा होळीच्या मानकऱ्याला असतो. होळीच्या मध्यभागी उभारलेल्या उंच बांबूच्या शेंडयाला पापडी, भाकरी व कोंबडीचे पिलू बांधतात. लाकडे आणि गवताच्या पेंडया रचून उभारलेल्या होळीला गाठी, बांगडी, करंडा, फणी, शेंदूर, कुंकू, नारळ इत्यादी पाटील पती - पत्नी पूजा करुन अर्पण करतात. होळीचा मानकरी व पाटील होळी पेटवितात. पेटत्या होळीला नवीन लग्न झालेली जोडपी प्रदक्षिणा घालतात स्त्रिया- पुरुष होळीनिमित्त गाणी गातात, ढोल व कऱ्हाळी वाजवून रात्रभर नाचतात. होळीनिमित्त गायले जाणारे गाणे पुढीलप्रमाणे -

बावीच्या काठी लावेल्या केली
या केली शिपजो ग मायी
निरावून शिरावून कोठ जाते लेकी
मी जाते सासया घरी

(होळीच्या मोठया सणाला होळीचे गुणगानअसणारी व मनोरंजन पर अशी गाणी स्त्रिया मोठया उत्साहाने गातात. शिमगा काळोखी एकम असे संबोधतो. सदर दिवशी आंबे खाण्याला हा समाज खूपच महत्व देतो. घरातील कर्ता पुरुष सकाळी आंघोळ करुन हिरवा या कुलदेवतेसमोर दिवा लावून आबां ठेवून, नारळ फोडून व कोंबडा कापून शेंदूर फासतात. पूजेसाठी ठेवलेले सर्व पदार्थ नंतर सर्वांना प्रसाद म्हणून वाटतात. रितीरिवाजाप्रमाणे घरात शिजविलेले मटण, मासे यांचे जेवण करतात. दुपार नंतर सोंग घेऊन (पुरुष स्त्रियांचा पोशाख परिधान करुन) संबळाचा तालावर नाचत गावभरं पोसत (पैसे) जमा करत फिरतात. लहान मुलेही मोठयांचे अनुकरण करुन पोसत जमा करतात व आपआपसात पैसे वाटून घेतात.)

काळोखी बीज म्हणजे होळीचा शिळा सण होय. या दिवशीही वरील प्रमाणेच कार्यक्रम असतात. पाण्याने एकमेकांना भिजवतात. तर काळोखी तिज म्हणजे उधळा किंवा धुळवड होय. या दिवशी स्त्री-पुरुष होळीची राख पाण्यात भिजवून एकमेकांच्या अंगावर टाकतात. काहीजण चिखलातही लोळतात. मुलीही होळीची गाणी गात घरोघरी जाऊन पोसत जमा करतात. पण पोसत मागताना त्या कपडयांच्या चिंध्यापासून बनविलेल्या बाहुला - बाहुलीला वधु-वराप्रमाणे बाशिंग मुंडावळया बांधून सजवितात.

**विवाह पध्दती :-**

अन्य जाती-जमातीप्रमाणे मल्हार कोळी समाजही वैवाहिक संबध प्रस्थापित करतांना फारच दक्ष असलेला दिसतो.या समाजात पाच दिवस लग्न सोहळा चालतो. तत्पूर्वी मुलाकडील मंडळी मुलीच्या घरी जाऊन लग्नासंबधी बोलणी करुन एकमेकांना सर्वकाही पसंत पडल्यास मानपानाच्या गोष्टी निश्चित झाल्यास वरपक्षाकडील सुवासिनी स्त्रिया नियोजित वधूस कुंकू लावतात.

लग्नसोहळा हा सर्व नातलग, सगे-सोयरे व गावकरी मिळून पार पाडतात. लग्नाच्या एकूण पाच दिवसाच्या कार्यक्रमापैकी पहिल्या दिवशी **'जातनीवैरण'** (या कार्यक्रमास घाणेवरणा असेही म्हणतात.) हा कार्यक्रम पार पाडला जातो. जातणी म्हणजे जाते आणि वैरण म्हणजे भाताचे नवीन दाणे,तांदळाचे नवीन दाणे जात्यामध्ये पाच सुवासिनी गाणी गात गात दळतात. दळण्यापूर्वी विडयाची व आंब्याची प्रत्येकी पाच-पाच पाने जात्यास मध्यभागी बांधतात. हळद कुंकू लावतात आणि दोन किंवा तीन पायल्या भात दळून एका कोऱ्या टोपलीत ठेवतात. त्यानंतर दोन किंवा पाच मुसळे घेऊन त्याला हळद कुंकू लावून आंब्याची पाच पाने बांधून ती मुसळे घरासमोरील मंडपाच्या खांब्यालगत भाताच्या टोपलीत उभी करतात.

दुसऱ्या दिवशी हळदी समारंभ असतो. हळदी समारंभासाठी लग्न कार्य ज्यांच्या घरी आहे. त्यांच्या घरातील सुवासिनी स्त्रियांकडून गावातील सर्व स्त्री-पुरुषांना आमंत्रण दिले जाते.हळदी समारंभाला आलेल्या स्त्रियांना घोणेवरणीमध्ये दळलेल्या पिठाचा चौक (पाटाच्या आकाराचा ) मांडायला सांगितला जातो. त्यावर पाटा, वरवंटा ठेवला जातो. त्या पाटाला सुवासिनी स्त्रिया हळद कुंकू लावतात. त्यानंतर त्या पाटाच्या चारी बाजूस नवरा किंवा नवरी मुलीस हळद, खारीक,बदाम, सुपारी, विडयाचे पान इत्यादी ठेवायला सांगून एक पान मध्यभागीही ठेवायला सांगतात. यानंतर नवरा किंवा नवरी मुलीकडून पाच सुवासिनी स्त्रियांचा वरवंटयाला हात लावून हळद फोडली जाते. याला 'वटणे ' असेही म्हणतात

हळदी समारंभानंतर दुसऱ्या दिवशी विविध झाडांच्या फांद्या आणून मंडप सजवला जातो. मंडपाच्या मध्यभागी केळीचा किंवा नारळीचा खांब उंबरठा म्हणून उभारतात. दुपारी पुन्हा हळदीचा कार्यक्रम करतात. सायंकाळी कुळदेवी, गावदेवी,

चेडा, बहिरी भवानी, हिरवादेव, खंडोबा आदि देवतांची गवळी भगताद्वारे पूजा करतात. सदर प्रसंगी त्यांच्या अंगात येत. तेव्हा त्याच्या पाठीमागे उभ्या असणाऱ्या स्त्रिया देवाचे काय मागणे आहे ते भगताला विचारतात. देवांना सर्व काही व्यवस्थित दिले कि नाही याची विचारपूस करतात -

तेल पड तेल पड तेल पड<br>
गावदेव गावदेव माझे पावण्या आली<br>
काय काय बस्कार केला<br>
पाना फुला भरला विडा वग मान केला<br>
तेल पड तेल पड तेल पड<br>
चेरोबा देव पावण्या आला<br>
काय काय बस्कार केला<br>
पाना फुला भरला विडा वग मान केला<br>
तेल पड तेल पड तेल पड<br>
हिरवा देव पावण्या आला<br>
काय काय बस्कार केला<br>
पाना फुला भरला विडा वग मान केला

असे गाणे गातात. देवाची मागणी काय आहे ते सांगून लग्न सुखरुप पार पाडावे म्हणून देवाला नारळ, कोंबडा दिला जातो. या कार्याक्रमास तेला म्हणून संबोधले जाते. त्या रात्री जेवणाचा कार्यक्रम संपल्यानंतर नाच गाणे केले जाते. त्यातले एक गाणे पुढीलप्रमाणे पाहण्यासारखे आहे.

माझ्या बापा दारी चाफा तो हिरव्या पानाचा<br>
तुझा मामा आलारे मोठया मानाचा<br>
माझ्या बापा दारी चाफा तो हिरव्या पानाचा<br>
तुझी मावशी आली रे मोठया मानाची<br>
माझ्या बापा दारी चाफा तो हिरव्या पानाचा<br>
तुझा काका आला तो मोठया मानाचा

अशी अनेक गाणी रात्रभर बेधुंद होऊन गातात.

लग्न समारंभाच्या दिवशीही सकाळी दोघांना हळद लावली जाते, बाशिंग बांधण्यासाठी सर्व गावकऱ्यांना बोलावले जाते. मुलीचा मामा व पाटील यांच्याकडून बाशिंग बांधले जाते. त्यानंतर परातीत हळद कुंकवाचे पाणी करुन त्यात सुपारी, तांदळाचे

दाणे व पैसे ठेवतात. त्यात वधु-वराचे पाय घोळवतात.दोन कुमारिका किंवा सुवासिनी स्त्रिया त्या दोघांचे पाय धुतात.नंतर दोघांच्याही ओंजळीत तांदूळ दिले जाते. त्यांना आई,काकी, मामी, आत्या, मावशी, अशा क्रमाने आरती करुन ओवाळतात.

लग्न घटका जवळ आल्यानंतर नवरा मुलगा नवरीच्या दारी येतो तेव्हा नवरीची आई काकी, मावशी अशा पाच सुवासिनी त्यांची ओवाळणी करतात.मांडवाला टांगलेली पापडी कटयारीने त्याला फोडायला सांगतात. त्यानंतर मामाच्या आग्रहाने तो मंडपात येतो, तेव्हा भटजीकडून मंडपातील कुंकवाचा चौक मोडला जातो. नवरा नवरीला पाटावर उभे करुन दोघांच्या मामाकडून त्यांच्या तोंडात विडयाचे पान दिले जाते. उपस्थितांकडून त्यांच्यावर तांदळाच्या अक्षता टाकल्या जातात. लग्नानंतर आप्तेष्ट व गावकरी कुलदैवते यांचे ते दोघेही दर्शन घेतात. लग्नानंतर नवरीला नवऱ्याच्या घरी आणतात. त्यांच्या घरातील भिंतीवर काढलेल्या लग्नाच्या चौकास नवरा मुलगा कटयार मारतो. त्यातून लग्न झाल्याचा संकेत दिला जातो. नंतर जेवणाचा, मद्यपानाचा कार्यक्रम चालतो, वधू-वराचे वडील डोक्याला फेटा सदृश कापड बांधून आपआपल्या हातात घेतलेले दारुचे पेले एकमेकास देऊन 'राम राम याही 'असे म्हणतात. नाते जोडले गेल्याचा तो संकेत असतो.

नवरा व नवरी गावातील गावदेवी व कुलदैवतांचे दर्शन घेऊन घरी येतात. घरी आल्यानंतर लग्नासाठी मध्ये धरलेला अंतरपाट घरात अंथरला जातो. उंबरठयाजवळ अंथरलेल्या आडव्या कपडयाच्या खाली मुसळ व झाडू ठेवतात. नवरी दरवाज्यात आल्यावर तिची तांदळाने आंजुळ (ओंजळ) भरतात आणि नवरा मुलगा तिच्या पाठीला हात लावून दोघेही घरात प्रवेश करतात. गृहप्रवेश केल्यानंतर नववधूला परातीतील हळदकुंकू टाकलेल्या पाण्यात पाय बुडवून त्या अंथरलेल्या कपडयावरुन पाच पावलं चालायला लावतात.नवरी घरात आल्यांनतर तिच्यासोबत आलेल्या बाईने (पाठराखीण ) ते मुसळ व झाडू उचलायचा असतो. नवरी घरात आल्यानंतर देव-देवी खेळविण्याचा कार्यक्रम होतो. कुलदैवतांच्या चौकासमोर आंजुळ ठेवून दोघेही जोडीने नमस्कार करतात. नंतर नवरीला चुलीजवळ नेतात. तेथे चुलीवर माणस (स्वयंपाकाचे मोठे पातेले) ठेवलेले असते. नंतर नवऱ्याची आई दोघांनाही मांडीवर घेते.त्यानंतरनवरी आवाज येणार नाही या बेताने हळूच झाकलेले भाणस उघडते व नवऱ्याला घास चारते. जेवण

झाल्यानंतर ती नवऱ्यचे हात धुते. हात धुताना ती म्हणते, 'पाणी टाकायचे काय द्याल ' तेव्हा तो म्हणतो 'अंगठी, गळयातले पाच मणी, हार वगैरे, ' तेव्हा खरकटे पाणी ती फेकते. नवऱ्याच्या घरी नवरीचे नाव बदलतात. तेव्हा नवऱ्याची आई पुढील गाणे म्हणते -

लेक माझा चांद जसा
सून माझी चांदणी जशी
लेक माझा वाघाचा पंडा
सून माझी सेपचा गोंडा
(शब्दार्थ :- पंडा - वाघाचे पिलू, सेप - शेपटी )

असे आईने दोघांचे गुणगान गायल्यानंतर देव चौकासमोर दोघांनाही बसवितात. गावचा पाटील त्या दोघांचे बाशिंग सोडवितो. सोडलेले बाशिंग व हारतुरे एका ताटात घेऊन नवरीच्या डोक्यावर ते ताट ठेवतात. दोघांना माळयावर चढवितात. त्यांच्याबरोबर पाच सुवासिनी स्त्रिया जातात. घरातील आडयाला दोघांचेही बाशिंग बांधले जाते. नंतर माळयावर पाच माठ भरलेले धान्य ठेवतात. त्यात तिला हात घालायला सांगून विचारतात, 'भरलेले आहे की रिकामा ? ' तिच्या होकाराने पाच माठ तपासून पाहतात व तिला उखाणे घ्यायला सांगतात. त्यावेळी ती 'साकड घालते देवाला सुखी ठेव माझ्या -------------- रायाला ' किंवा 'बाजारातून आणले टरबुज त्याची काढली साल --------------- रावांच्या नावाचे कुंकू लावते लाल 'असे अनेक उखाणे घेते.

या समाजात पूर्वी वैवाहिक संबध प्रस्थापित करतांना इतर जातीची मुलगी सून म्हणून स्विकारणे किंवा मुलीने अन्य जातीतील मुलाशी लग्न करणे निषिध्द मानले जात असे. पण सध्या हे बंधन फारसे पाळले जात नाही. आंतरजातीय विवाह होताना दिसतात.

सदर समाजात मुलीच्या बापास भाताच्या रुपाने देज (हुंडा) देण्याची प्रथा होती. पण सध्या मुलीच्या बापाकडूनच देज घेणे सुरु झाले आहे. हा प्रभाव इतर जाती धर्माच्या सहवासाने पडलेला दिसतो. एखाद्या मुलीचा नवरा मृत्यू पावला तर त्या मुलीस दुसरे लग्न करता येते. त्या प्रथेस 'पाठ लावणे ' असे म्हणतात. किंवा एखाद्या मुलाने पत्नीच्या निधनानंतर किंवा पत्नीस सोडून दिल्यानंतर दुसरे लग्न केले तर त्यास 'पाठ लावली 'असे म्हणतात.

## नृत्ये :-

मल्हार कोळी समाज नृत्यालाही स्वतःच्या जीवनात खूपच महत्व देतो. सामुहिक नृत्ये हे इतर आदिवासीमध्ये पहायला मिळणारे वैशिष्टय येथेही आढळते. देवी-देवतांच्या पूजेप्रसंगी सण-समारंभानिमित्त मनोरंजन म्हणून किंवा श्रमपरिहाराच्या हेतूने नृत्ये केली जातात. नृत्याला अनुसरुन वेशभूषा करुन ढोलनाच, घुंगुरकाठी, ढोलकीचा नाच, कामडी नाच, धुमशा (तुर) नाच, घोर नाच, तारपा नृत्य व गौरी नाच इत्यादी प्रकार ते सादर करतात. पूर्वी वारली, कातकरी, कोकणा, क. ठाकर, महादेव कोळी, मल्हार कोळी या जमाती आपआपला सामाजिक - सांस्कृतिक

वेगळेपणा प्राणपणाने जपत होत्या. असे त्यांच्या समाजातील कार्यकर्ते हरिश्चंद्र कोलेकर यांच्याकडून ऐकायला मिळते. प्रत्येक आदिवासी समाज आपल्या रुढी, प्रथा, परंपरा सण-समारंभ व नृत्ये वेगळेपणाने सादर करत असत. त्यामुळे वारलींचे तारपा नृत्य, कामडीनाच, ठाकरांचा ढोलनाच, कातकऱ्यांचा ढोलनाच, झिंगीचा नाच, महादेव कोळीचा ढोलनाच व मल्हार कोळींचे गौरी नृत्य असे वेगळेपण पहायला मिळत असे. पण या सर्व जमाती एकमेकांच्या शेजारी-शेजारी वास्तव्य करत असल्याने एकमेकांच्या रुढी, प्रथा, परंपरा, सण-समारंभ व कलाप्रकारांचे अनुकरण करतांना आढळतात. मल्हारकोळी समाजही याला अपवाद नाही. मल्हार कोळी समाजातही वरील सर्व नृत्य प्रकार व नृत्यात गायली जाणारी गाणी पहायला, ऐकायला मिळतात. मल्हार कोळी समाज आज सादर करत असलेली नृत्ये पुढीलप्रमाणे आहेत.

**कामडी नाच :-**

सदर नाच भाताच्या रोपांची लागण केल्यानंतर व कोली भाजीच्या सणापासून नवाभात येईपर्यंत केला जातो. या नाचास नाराणदेवाचा नाच म्हणूनही ओळखले जाते. पुरुष पायात घुंगरु बांधून फेर धरुन टाळया वाजवत नाचतात. स्त्रियाही पुरुषांना गाणे गाऊन साथ देतात गाणी आपल्या देवी-देवतांची व मनोरंजनपर अशी असतात. त्यातील एक गाणे असे आहे.

नारान देवा तुझा वेडार । नाचू दे बापडा
वेडा नाचर वेड सदा । गहलां नाच गहला सदा
बहरम देवा तुझा वेडार । गहला नाच गहला सदा
वेडा नाचरं वेडा सदा । गहला नाच गहला सदा ।

(शब्दार्थ :- गहला - गबाळ, बापडा- बिचारा )

कणसरी म्हणजे लक्ष्मी . तिचा राग घालवण्यासाठी नाराणदेव व बहरम देव तिच्या पुढे वेडयांचे सोंग घेऊन वेडे वाकडे नृत्य करत आहेत. असे सदर गाण्यातून पहायला मिळते.

**गौरी नृत्य :-**

कोलीभाजीचा सण साजरा केल्यानंतर सदर नृत्यास सुरवात करुन गौरी गणपतीच्या सणापर्यंत हे नृत्य सादर केले जाते. स्त्रिया गोल फेर धरुन ढोलाच्या किंवा ढोलकीच्या तालावर स्वतंत्रपणे तर कधी पुरुषांबरोबर एकत्र नाचतात. नृत्य करतांना पुरुष पायात घागऱ्या (घुंगरु) बांधतात . ढोल किंवा ढोलकी वाजविणारा मध्यभागी बसून बेधुंद होऊन वाजवितो. नृत्यात अधिकाधिक रंगत आणण्याचा तो प्रयत्न करतो. नृत्यप्रसंगी स्त्रिया गाणे गातात. त्या गाण्यास गौरीची गाणी असे म्हणतात. गौरीमातेच्या गुणगानाबरोबरच मनोरंजनपर गाणीही सदर प्रसंगी गायिली जातात. नृत्य करतांना पुढील गीत मोठया श्रध्देने गातात. त्या गाण्यास गौरीची गाणी असे म्हणतात. नृत्य करतांना पुढील गीत मोठया श्रध्देने गातात.

शंकर गेलाय गेलाय येऊदाला
पार्वती एकली एकली गं घरला
तिने अंगाचा अंगाचा मलू काढला
तिने मलाचा मलाचा बाळ बनविला
तिने दाराशा दाराशा उभा केला
शंकर आलाया आलाया येऊदाशा
बाल तू कोणाचा कोणाचा रे यो कोणू
मी तं शंकर शंकर पारवतीचा
काढली कंबर कंबराची सुरीद
टेकवली बाळाच्या बाळाच्या मानावरी
बाळाचा शिर गेला शिर गेला कैलासाला
बाळाचा धड पडला धड पडला धरणीला
बाळाच्या रक्ताच्या रक्ताच्या नदी निघाल्या
बाळाच्या बाळाच्या हाडाचा झाला चुरा
बाळाचा मासाचा मासाचा झाला गोळा

(शब्दार्थ :- येऊदाला - युध्दाला, येऊदाशा- युध्दाहून परतलेला )

अशी अनेक गाणी नृत्य करताना गायिली जातात. शंकर पार्वती प्रमाणे कुलदैवते, ग्रामदैवते, राम, लक्ष्मण, सीता, श्रीकृष्ण, राधा यांचे गुणगान गाऊन त्यांच्या प्रती श्रध्दाभाव प्रकट करणे हा या नृत्यप्रसंगी गायल्या जाणाऱ्या गाण्यांचा हेतू असतो.

**घोरनाच :-**

या नाचास 'टिपरी नाच' म्हणूनही ओळखले जाते. पावसाळा संपल्यानंतर कमीत कमी आठ- दहा पुरुष हातात टिपऱ्या घेऊन हा नाच करतात. नृत्य करतांना पुरुष हावभव, वादसंवाद यावर भर देतात. हे नृत्य करतांना पुरुष आकर्षक अशी वेशभूष करुन देवीदेवतांची व निती- विषयक गाणी गातात.

**धुमशा नाच :-**

स्त्रिया, पुरुष, मुले, मुली हा नाच करतात. धुमशा म्हणजे तुर वाद्य. या वाद्यांच्या तालावर गोल फेर धरुन ते नाचतात. तुर वाद्य वाजविणरा व थाळेवाला हे दोघेही फेराच्यामध्ये उभे राहून वाजवतात. तर नाचणाऱ्यापैकी धुमशाच्या तालावर उडकीवाला (उडया मारणरा) घुंगराची काठी घेऊन उडकी घेत असतो.

अशी विविध प्रकारची नृत्ये करुन आपल्या देवी-देवतांवरील श्रध्दाभाव जपण्याबरोबरच आपल्याजवळ असणारी नृत्यकला सादर करणे, गाण्यांची निर्मिती करुन त्यांचे सामुहिकपणे सादरीकरण करणे

व त्यातून आनंद उपभोगणे हा त्यांच्या नृत्यामागील हेतू असतो.

**समारोप :-**

वरील प्रमाणे मल्हार कोळी समाजाचे सामाजिक, सांस्कृतिक जीवन अनेकविध वैशिष्टयांनी ओत:प्रोत भरलेले आहे. आज शिक्षणाचा प्रसार आदिवासी मुलखात झपाटयाने होत आहे. त्यामुळे अनेक कुटुंबातील मुली 'शिक्षणशिवाय पर्याय नाही ' याची जाणीव ठेऊन उच्च शिक्षणही घेत आहेत. मल्हार कोळी समाजात मुला-मुलींचे शिक्षणाचे प्रमाण सध्या वाढते आहे. अनेक जण शिक्षक, लिपीक, पोलीस व इतर क्षेत्रातील उच्च पदे ही भूषवीत आहेत, ही मोठी आनंदाची बाब आहे. त्यांना आज राजकिय नेतृत्वही लाभत आहे. महादेव गोपाळ कडू व शंकर आबा गोवारी हे या समाजातील आमदार होते. तर सध्या पालघर लोकसभा मतदार संघाचे खासदार म्हणून बळीराम जाधव कार्यरत आहेत. याशिवाय ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थामध्येही प्रतिनिधीत्व करुन समाजाचे काही शैक्षणिक व आर्थिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करत आहेत. ही एक मोठी जमेची बाजू आहे. पण अजुनही सदर समाजात व्यसनाधिनता व अंधश्रध्दा खोलवर रुजलेली आहे, असे त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा वेध घेताना प्रामुख्याने पहायला मिळते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "आपणच आपल्या जीवनाचे शिल्पकार झाले पाहिजे त्याशिवाय स्वत:ची व समाजाची प्रगती होणार नाही, याची जाणीव ठेवून व्यसनाधिनता व अंधश्रध्दा हे आमच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचे अविभाज्य घटक आहेत " असे मानून जगणाऱ्या या समाजाचे प्रबोधन त्याच समाजातील आजच्या युवा पिढीने केले तर सदर समाज समस्यामुक्त व्हायला वेळ लागणर नाही. त्याचबरोबर आपल्या समाजात पारंपारीक पध्दतीने चालत आलेल्या चांगल्या जीवनमुल्यांचा पुरस्कार करुन सण-समारंभ, नृत्य प्रसंगी पहायला मिळणाऱ्या चांगल्या रुढी प्रथांचा पुरस्कार करुन त्यांचे जतन करणेही समाज व संस्कृतीच्या अस्तित्वासाठी गरजेचे आहे. या समाजास लोकसाहित्याचाही मोठा वारसा लाभला आहे. पण आजची तरुण पिढी त्याकडे दुर्लक्ष करीत आहे. ही सुध्दा एक चिंतेची बाब आहे. तेव्हा आजच्या पिढीने नविनतेचा स्विकार करण्याबरोबरच आपल्या सर्वांना आदर्श विचाराचे दान देणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक मूल्यांचे जतन केले तर हा समाज काळाच्या ओघात सर्वांनाच सदैव प्रेरणादायी ठरेल असे वाटते.

* * *

**संदर्भ ग्रंथ :-**


१. संपादक :- पं. महादेव शास्त्री जोशी - भारतीय संस्कृती कोश, दुसरा खंड, प्रकाशक - पं. महादेव शास्त्री जोशी, भारतीय संस्कृती कोश मंडळासाठी, दुसरी आवृत्ती इ. स. १९८५

२. संपादक :- पं. महादेव शास्त्री जोशी - मराठी विश्वकोश, खंड चौथा.

३. डॉ. शंकर व्यवहारे, लोकसंस्कृतीचा अंत:प्रवाह, प्रकाशक - प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९९.
४. आदिवी उपयोजना, प्रकाशक- आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन २००६-०७
५. डॉ. गोविंद गारे, महादेव गोपाळ कडू - आदिवासीची गोडगाणी, प्रकाशक - श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९८६
६. दयानंद मुकणे - जव्हार दर्शन, प्रकाशक - साहित्य कॉर्नर, गांधी चौक, जव्हार, जि. ठाणे, दुसरी आवृती २००८

**व्यक्ती संदर्भ :-**

१. श्री. जितेंद्र बाळकृष्ण गोऱ्हेकर, मु. पो. वज्रेश्वरी, ता. भिवंडी, जि. ठाणे
२. श्री. दत्तात्रय गायकर मु. पो. पोशेरी, ता. वाडा, जि. ठाणे.
३. श्री. हरिश्चंद्र लक्ष्मण कोलेकर, मु. कोलेकर पाडा, पो. वाडा, ता. वाडा, जि. ठाणे
४. श्री. सोमू कचरे, मु. पो. कुंर्झे, ता. विक्रमगड, जि. ठाणे

* * *

# आदिवासीचे पारंपारिक सण, उत्सव व पुजाविधी

* झैलसिंग पावरा

कष्टमय जीवनातून आदिवासी संस्कृतीचा उगम झाला आहे.जंगलातील खडतर जीवन, तहानभूक विसरुन सभोवतालच्या निसर्गाशी एकरुप होऊन बेभानपणे नाचतात-गातात हाच आदिवासीच्या पाया आहे. आदिवसी संस्कृती आत्मसन्मान, मानवतावाद मानणारी व निसर्ग आणि पशु-पक्षी यांचे पुजक आहे. आदिवासी हा पूर्ण विकसीत मानव असून त्याची स्वतंत्र भाषा, परंपरा, जीवनपध्दती एकसंघ आहे. संपूर्ण जीवनमुल्यानी भरलेली संस्कृती आहे.

स्व. पंडित नेहरुना आदिवासी संस्कृती बद्दल अमाप आदर, आत्मियता व प्रेम होते. नृत्य, संगित, परंपरा हे त्यांच्या जीवनाचे अंग आहेत. त्याचे जतन करणे, गरजेचे आहे म्हणून त्यांच्या विकासासाठी त्यांनी पाच तत्वे मांडली होती. सुधारणाच्या हमगर्दीत हया साध्या-भोळया लोकांच्या आनंदाचा ऱ्हास होऊ नये असे त्यांनी नमुदही करुन ठेवले आहे.

आदिवासी आज शैक्षणिक व आर्थिकदृष्टया मागे नाही. महाराष्ट्रात आदिवासीच्या ४५ जमाती आहेत. त्यांच्या बोली-भाषा वेगवेगळया आहेत. परंतु त्यांच्या संस्कृतीचा गाभा एकच आहे. वारलीचा तारपा, बोहाडा, कोकणांचा पावरा, मादळ व डोंगऱ्यादेव, डांगीनृत्य, कोलाम / गोंडाचे दंडारी नृत्य, भिल्ल-पावरा, कोरकूचे होळीनृत्य इत्यादी लोकनृत्य व लोककला हे आदिवासी जीवनाचा एक भाग असून त्याची ताल व लय सारखीच आहे. दुसरी बाजू म्हणजे त्यांच्या चालीरिती, रुढी परंपरा आहेत.

पूर्वापार चालत आलेल्या या परंपरेत काळानुरुप काही बदल ही झाले आहेत. शिक्षणाच्या प्रसाराबरोबर अंधश्रध्देपोटी ज्या काही जाचक रुढी होत्या त्यांना आज बगल दिली आहे. मात्र त्यांच्या मूळ निसर्ग पुजनाची परंपरा कायम आहे.

रोडालीकार जगन वळवीच्या गीतातून

देह डोगू मे रहनारा आमू
पेंडा पालोंट खानारा
धरती या हॉ कीले मानणरा आमू
प्रकृतीले पुजनारा
आदिवासी मिले हे दूर देखे गोगावेद

शहादा, जिल्हा धुळे

म्हणजे डोंगरदऱ्यात राहणारे आम्ही आंबाडीची भाजी खातो परंतु धरतीमातेला प्रकृतीला आम्ही पुजतो. आमचा बांधव दूरवरुन दिसला तरी आमची छाती भरुन येते हा भावार्थ आहे.

नंदूरबार जिल्हयाचा विचार करता भिल्ल, पावरा, कोकणी, हया प्रमुख जमाती आहेत. होळी, दिवाळी व दसरा, पोळा हे सण उत्सव आहेत. त्यात होळीला अनन्यसाधारण महत्व आहे. निलीचारी, डोंगऱ्यादेव, खळपुजने, वाहादेव, बापदेव, कणसरीपुजा, अन्नदेवता, नवाई, गोव्हनपुजा, इंदलपुजा इत्यादी प्रमुख पारंपारीक पुजेचे उत्सव आहेत. आदिवासीमध्ये जन्मापासून ते मरणापर्यंत विविध पुजाविधी आहेत. त्यात भरपूर जीवनमुल्ये जोपासली गेली आहेत. लग्न, उत्तरकार्य यामध्येही ठळक वैशिष्ट आहेत.

**१. लग्न :-**

आदिवासीमध्ये हुंडा पध्दत नसल्याने हुंडाबळी व स्त्रिभूण हत्येला थारा नाही. नवरा मुलाच्या वडीलपक्षाकडून नववधूच्या वडीलपक्षाला नाममात्र (रु.२५५१ ते ११०२५) पैशाच्या स्वरुपात देज म्हणून दिले जाते. म्हणजे दोन्ही कुटुंबातील संबध बांधणीचे मुल्य यात जोपासले गेले आहे. मुलाकडील, लोक मुलीच्या घरी गेल्यावर पंचासमोर धोतरची पथारी अंथरुन ताटामध्ये दिवा पणती लावून विधीवत पुजा झालेवर सदर देज दिले जाते. स्विकारले जाते. याप्रसंगी नववधू कडील मुली गीत गातात.

बाहका रां थोडेज देज लेजी

बेनाले निभाडे नी, निभाडे

गीतात नवरीच्या वडीलांना सांगतात की, देजच्या रुपात जे पैसे देऊन राहिले ते थोडेसेच ध्या, कारण नवऱ्याकडे गेल्यावर आपल्या मुलीला पटले नाही किंवा त्यांनी चांगले वागविले नाही तर तिला आपण ते देज परत करुन आपल्या घरी आणू शकू. नंतर ती तिच्या पसंतीच्या मुलाबरोबर पुन्हा दुसरे लग्न करु शकेल. म्हणजे स्त्रीमुक्ती स्वातंत्र, स्वस्वाभिमानाचा भाव, जीवनमुल्य यात दडलेले आहे.

सर्व आदिवासीमध्ये ही एक प्रमुख प्रथा आहे की, जी पूर्वापार परंपरागत चालत आलेली आहे. गाव कारभारी पंच, पुजारा, परधान यांच्या हस्ते लग्न लागते. नववधूला जेव्हा घरात घेतात. तेव्हा स्वयंपाक घरातील (गिरहाकामाता) खुटांची पुजाविधी करुन वधु-वरांना त्यांचे पाया पडावे लागते. यावेळेस त्यांना धोतर व सालाच्या गाठीत एकमेकांना बांधले जाते. अग्नी देवताला साक्षी मानून सर्व आदिवासी निसर्ग देवांच्या नावाने पुजारा पुजतो. या विधीद्वारेच खरे लग्न लागते, हीच परंपरा आहे. मात्र आजकाल भटजीद्वारे आदिवासीत जे लग्न होत आहेत ते संस्कृतीला धरुन नसून ते नुसता फार्स किंबहुना नुसती औपचारीकता आहे. कारण भटजीच्या मंत्रात निसर्ग देवाची नावेच नाहीत.

लग्न कार्यात पारंपारीक वाद्ये ढोल, मांदल, ढोलकी, तुतडया, पेपाऱ्या व थाळी इत्यादीची देखिल वाजविणे अगादेर पुजा, सन्मान केला जातो. धरतीमातेची, निसर्ग देवतांची देखिल नाचण्या अगोदर पुजा केली जाते. म्हणजे कोणतेही कार्य सुरु करण्या अगोदर निसर्गाची परवानगी मागितली जाते.

करणपूर खेतिया येथील कवि कप्तानसिंग यानी पावरी बोलीभाषेत रचना केली ते गीत.

धरती मातापर नाचणे लाग्या
धरती वो माता ने पाया पडो वे ।
धरती मातापर नाचणे लाग्या
धरती माता खुसी मां नाचाडे वं ।
सांगने वा मांदल घडो
मांडया मांडया नाचणे चालू वालो वो

म्हणजे गीतकार म्हणतो की, अे धरणीमाता मला नाचण्यासाठी परंवानगी दे. त्यासाठी तो धरतीमातेला वंदन पुजा करतो. मग धरतीमाता त्याला खुशीत, आनंदाने नाचविते. सागाच्या लाकडाचा मांदल (वादया) घडून तालबद्द उत्साहात नाचण्याबाबत परंवानगी मागत आहे.

आदिवासी मौखिक गीते आहेत. परंतु त्यांना लिखित स्वरुपात आणल्यास त्यातील जीवनमुल्ये समजण्यास मदत होईल.

पुर्वी लग्नकार्यात सर्रास दारुचा वापर केला जात होता. आलेल्या पाहुण्यांना प्रत्येकांना दारु दिली जात होती. परंतु ते आता बंद झाले आहे. तसेच देज देखिल खूप होते ते देखिल कमी आणि स्थिर झालेले आहे. एखाद्या अगदी गरीब माणसांकडे लग्न किंवा इतर कार्य असेल तर गावकरी मिळून फाळा करतात व ते कार्य पार पाडतात ही एक सामुहिक मदतीची भावना देखिल आदिवासीमध्ये आहे.

**खळं पुजणे :-**

शेतातून जे पिक नवीन आलेले असते. उदा. ज्वारी, बाजरी, भात, उडीद इत्यादी धान्य घरात नेण्या अगोदर त्याची पुजा केली जाते. कापणी करुन सदर धान्य मळण्यासाठी खळयात ठेवले जाते. मळणी झालेवर त्या धान्याची पुजा केली जाते. दिवाळी, दसरानंतर साधारण जानेवारी, फेब्रुवारीत गोलाकार केलेल्या जागेला खळे म्हणतात.

ज्या कुटुंबातील खळ पुजणे असेल ते सर्व गांवकऱ्यांना निर्मण दिलेले असते. धान्याची पुजा करतात व कोंबडीचे नैवैद्य देऊन सर्व सहभोजन करतात. त्यानंतरच काढलेले धान्य घरात नेले जाते आणि कणगीत, कोठीत ठेवतात. पिकलेले धान्य वर्षभर तरी पुरावे अशी देखिल यामागील भावना आहे. प्रत्येक कार्यात

समुह पुजा व जीवनाचे मूल्य ओतप्रेत भरलेले आहे.

**इंदलपुजा :-**

अन्नधान्य, गायवासरु इत्यादी धनाची बरकत सातपुडयातील पावरा समाजात इंदल पुजा केली जाते म्हणजे इंदिराजा- शेतकऱ्यांच्या कष्टांच्या प्रतिकात्मक व धान्याचे पुजा करणे म्हणजे इंदल. जशी सत्यनारायणची महापुजा असते त्यापेक्षाही मोठी पुजा म्हणजे आदिवासीमधील इंदलपुजा कही मंडळी इंदलला इंद्र म्हणतात किंवा समजतात ते चुकीचे आहे.

इंदिराजा हा कोण होता, त्याचे आईवडील कोण होते ? तो कसा मोठा झाला ही फार मोठी आख्यायिका आहे, त्यांचे कोणी नव्हते म्हणून तो जंगलात राहून कळंब झाडावर मोठा झाला म्हणून कळंब झाडालाच त्याने आईवडील मानले. मात्र इंदिराजा शेवटपर्यंत कुँवारा राहिला.

इंदिराजा कळंब झाडावर मोठा झाला म्हणून इंदलपुजेत कळंब झाडाच्या फांदीला पुजतात.आयुष्यात कधीतरी एकदा किंवा एकाच कुटुंबात पाच वर्षातून एकदा असे इंदलपुजा केली जाते. ज्यांच्याकडे इंदलपुजा करायची ठरविलेले असते त्या घरी गावकरी पुजारासहीत एकत्र येऊन बैठक होते आणि इंदलपुजेबाबत नियोजन पक्के होते.

त्या घरी इंदलपुजनच्या सात दिवस अगोदर पुडे बांधण्याचा कार्यक्रम होतो. पळसाच्या पानात हळद लावलेले धान्य (बादी) (भरड किंवा नाचणीसारखे भातजन्य धान्य) ठेवून विधीवत पुडे बांधतात. नंतर होब यात्रेने गावाजवळील जंगलातातील कळंब झाडाची, तीन फांदयाना कच्चे सुतबांधून पुजा करतात. सदर हळद लावलेले धान्याला नेवता असे म्हणतात. इंदलपुजेची खबर देणे म्हणजे त्या त्या घरी, दूरवरील नातेवाईक यांच्या घरात ते नेवता टाकून निमंत्रण देणे.

सात दिवसानंतर इंदलच्या दिवशी ढोल, मांदल, डोलकी, पेपाऱ्या, तुतडया इत्यादी वादयाची विधीवत पुजाकरुन त्याचा सन्मान करतात हे सर्व राणी गिरहोणमातेच्या साक्षीने करतात. पुजारा नैसर्गिक देवांच्या नांवे उच्चारतो व घरातील दोन सुनबाई त्यांची आरती करतात. यावेळी घरातील एक व दुसरे दोन असे तीन कुँवारा मुलांना देखिल या पुजेच्या बंधनात अडकविता नंतर वाजत - गाजत मिरवणूकीने, होब यात्रा त्या कळंब झाडाच्या फांदया घ्यायला जातात.

त्याप्रसंगी मुली गीत गातात.

आज इंदिराजाने मोल से
कंबन राजान सिगे इंदिराजा खेलेहे
हुने चवरे इंदिराजा बहयूह
करीन इंदिराजाह लेणेह आमू आव्या

म्हणजे आज इंदिराजाचा दिवस आहे. आम्ही होब घेऊन आलो आहे. कळंबच्या प्रत्येक फांदीवर खेळणारा इंदिराजा तुला घ्यायला, तुझी पुजा अर्चना करण्या करीता आलो आहोत. कळंब झाडाची पुजा विधी करण्या पूर्वी (सात दिवसापुर्वी) कच्चे सूत बांधलेल्या तीन फांदया छाटतात. तीन फांदया तीन्ही कुँवारा मुलांच्या हातात धरले जातात, पुजारा पुजाविधी करतो, दुध - पाण्याचा शिडकावा मारुन त्या फांदया पवित्र करतो. त्यानंतर ही होब घरी परत येते. घराच्या दारावर त्या तीन फांदीवाले कुवारे मुलांना उभी करतात. घरातून दोन सुनबाई टोपलीत कणगीतील धान्य आणतात. त्या फांदयाची पुजा, आरती करतात नंतर अंगणातील इंदल पुजनच्या जागेवर नाचत-गाजत जातात.

अंगणात तीन खड्डे खोदून शेणाने सारवलेले असते. त्या ठिकाणी ही होब येते. तीन खड्डयात त्या फांदया प्रत्येक एक प्रमाणे ठेवतात. त्यातील पहिल्या खड्डयातील फांदी म्हणजे हुडलदेव यात माती भरतात. (हुडलदेवला प्रथम मान दिल्याशिवाय पुजा सुरुच होवू शकत नाही.) दुसऱ्या व तिसऱ्या खड्डयात मापाने मोजून धान्य भरतात. अशा प्रकारे पहिली फांदी हुडलदेव, दुसरी करहणमाता म्हणजे याहा मोगीचे प्रतिक तर तिसरी फांदी इंदिराज शेतकऱ्यांचे प्रतिक या ठिकाणी दोन ते तीन तास पुजाविधी चालतो. म्हणजे पृथ्वीतलावरील सर्व देवदेवतांचे नांवे पुजा करतात नंतर रात्रभर नाचतात. यावेळीस आजूबाजूच्या परिसरातील गांवकरी समुहाने ढोल आणतात व सहभागी होतात. २० ते ५० इतके ढोल होतात. त्यांच्यात स्पर्धा देखिल होते.

मधल्या रात्री तीन ते पाच वाजेच्या दरम्याने पुजेच्या घरात विविध पुजा होते. त्याला पाटला पुजणे म्हणतात. तीन देवतांचे तीन पाटले. कुँवारे मुलांना समोर ठेवून त्यांची विधीवत आंघोळ घालून पुन्हा त्या खडयांच्या येथे मिरवणुकीने आणले जातात. सकाळी पाटले उठवायचे कार्यक्रम होतो. पाटले उठवतेवेळीस त्या तीन फांदया देखिल काढतात. रात्री मोजून खड्डयात भरलेले धान्याची पुन्हा पायली मापाने मोजतात. सकाळी मोजलेले धान्य रात्री पेक्षा जास्त भरते म्हणजे देवाच्या कृपेने धाना मध्ये वाढ होते ही भाबळया आदिवासीची सकारात्मक समज आहे. त्या देवांच्या फांदयाची नदीत जाऊन विधीवत विसर्जन केले जाते. आधल्या दिवशी दुपारी ३.०० वाजता सुरु झालेली पुजा दुसऱ्या दिवशी १२.०० वाजता संपते. ही पुजा सर्वात मोठी आणि कडक पथ्येची असते. म्हणून काळजीपुर्वकच केली जाते.

पुर्वी जवळपासचे, प्रतिष्ठित लोक इंदलच्या घरी प्रत्येकजण भेट म्हणून बोकड आणीत. पणती पध्दत आता बंद - झालेली आहे. कारण नाहक बोकडांची संख्या तर जास्त होतेच शिवाय ते परतावा सारखे असल्याने एखादया गरीब कुटुंबाला परतफेड म्हणून ज्यांनी त्यांचेकडे बोकड आणला त्यांना देणेस परवडत नाही.

बोकडाचे मटण व मक्याची खिचडी किंवा भात हे नैवेदय दिले जाते व त्यांचेच जेवण केले जाते. सामुहिक जीवन यातून दिसते.

**जन्ममृत्यू :-**

आदिवासी समाजात जे बाळ जन्माला येते त्याची विधीवत पुजा करुन ते स्विकारले जाते मुलगा-मुलगी असा भेद नाही. माणूस मेल्यावर मात्र विविध मुल्ये जोपासणाऱ्या विधी केल्या जातात.

उत्तरकार्याच्या वेळीस मृत माणसाने कुठल्या पशु-पक्षीचा अवतार घेतला हे पारखण्याची देखिल भोळया भाबडया लोकांची पध्दत आहे. मृत आत्म्यास देखिल नैवेद्य दिला जातो. त्यांच्यापुरते गोडधोड स्वयंपाक करतात. काही जमातीत मसनवटीवर जाऊन त्यांना ज्या ठिकाणी पुरले, जाळले त्या ठिकाणी जाऊन नैवेद्य दिले जातो. हे देखिल पुजाविधी करुनच पार पडते. काही जमातीत स्वतःच्या घराच्या पावरा समाजात उत्तरकार्याच्या आदल्या दिवशी उंडी ठेवण्याचा कार्यक्रम होतो. गोवऱ्या जाळून त्यांची राख करणे बारीक चाळणीने चाळून बारीक राख काढली जाते. स्वयंपाक घरात किंवा मोक्याच्या जागी पुजाऱ्यामार्फत राखेचा गोलाकार गुळगुळीत ओटा तयार करतात त्यावर मृतास पिण्यासाठी पियाली, मासे-भात असे जेवण ठेवतात. त्याला टोपलीने झाकून ठेवतात. त्यानंतर घरातील व जमलेले सर्व अबालवृध्द घरापासून लांब काही अंतरावर जमून बसतात. तासाभरानंतर घराकडे येतात. तो टोपला उघडून पाहतात. मृतआत्मा येऊन ते नैवेद्य खाल्याचे विविध पशु-पक्षीचे पायांचे निशाण त्या गुळगुळीत ओटयावर - झाल्याचे पाहतात. काही विशिष्ट पशु-पक्षीचे निशानी असल्याची समज होते आणि अमूक -अमूकचा अवतार त्या मृत व्यक्तीने घेतल्याचा तर्क बांधून स्वतःचे समाधान करुन घेतात. म्हणजे माणूस मेल्यानंतरही तो कुठल्यातरी रुपात आपल्याभोवती आहे असे पारखण्याची ही पध्दत पारंपारीक चालत आलेली आहे. यात मोठे जीवनमुल्य आहेत. कारण मृतास देखिल सन्मान दिला जातो. दुसऱ्या दिवशी विधीवत पुजाकरुन विधी समाप्ती होते. गावातील प्रत्येकजण पूर्वी दारुची बाटली आणत असे. ते आता बंद झालेले आहे. त्या ठिकाणी थोडीफार साखर व धान्य आणतात. मयतच्या वेळीस, उत्तर कार्यात आता कपडे आणण्याचे बंद करण्यात आले आहे. गरीबाकडे असा प्रसंग आला तर गावंकरी सर्व मिळून आर्थिक मदत करुन कार्य पार पाडतात. ही सामुहिक भावना चांगली आहे.

* * *

# प्रश्न आदिवासींच्या अन्नसुरक्षिततेचा

* प्रा. डॉ. जे. एस. इंगळे,

प्रस्तुतचा शोधनिबंध हा चार भागात विभागला आहे. पहिल्या भागात अभ्यास विषयाचे प्रास्ताविक, अभ्यास विषयाची उद्दिष्टये,अभ्यास विषयाची व्याप्ती व मर्यादा आणि संशोधन पध्दती इत्यादी घटकांची माहिती दिली आहे. शोधनिबंधाच्या दुसऱ्या भागात **"अन्न सुरक्षा"** या संकल्पनेची व्याख्या, अन्नसुरक्षेच्या अवस्था इत्यादी बाबींची माहिती दिली आहे. शोधनिबंधाच्या तिसऱ्या भागात ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यतील आदिवासींच्या अन्नाच्या असुरक्षिततेस जबाबदार असणाऱ्या घटाकांचे स्पष्टीकरण दिले आहे. तसेच अन्नाच्या असुरक्षिततेचे निकषही दिले आहेत. शोधनिबंधाच्या चवथ्या भागात निबंधाचे प्रमुख निष्कर्ष आणि अन्नाच्या सुरक्षिततेपासून वंचित असणाऱ्यांना अन्नाची सुरक्षितता लाभावी यासाठी प्रस्तुत अभ्यासकाने सुचवलेल्या उपयांचा समावेश आहे.

## विभाग पहिला

### १.० प्रास्ताविक

आज जगातील जवळ -जवळ १०० कोटी लोकसंख्या आणि भारतातील सुमारे २५ कोटी लोकसंख्या ही अन्नाच्या सुरक्षिततेपासून वंचित आहे. भारतात एकूण लोकसंख्यापैकी २० टक्के लोकसंख्या अन्नाच्या बाबतीत असुरक्षित आहे. तर, एकूण आदिवासी लोकसंख्येपैकी सुमारे ८० टक्के लोकसंख्या ही अन्नाच्या बाबतीत असुरक्षित आहे. अशा प्रकारे सर्वसाधारण लोकसंख्येपेक्षा आदिवासी समाजात अन्नाच्या बाबतीत असुरक्षित असणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. चिंतेची बाबत अशी की, हे प्रमाण कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस वाढतच चालले आहे.

### १.२ अभ्यास विषयाची उद्दिष्टये.

या अभ्यास विषयाची प्रमुख उद्दिष्टये खालीलप्रमाणे आहेत.

१. आदिवासींच्या अन्नाच्या असुरक्षिततेस कारणीभूत घटकांचा अभ्यास करणे.

२. अन्नाच्या असुरक्षिततेचे निकष तयार करणे.

३. अन्नाचीअसुरक्षितता लाभलेल्या लोकांना अन्नाची सुरक्षितता प्राप्त व्हावी यासाठी उपाय सुचवणे.

साई प्लाझा, इस्लामपूर, ता. वळवा, जि. सांगली - ४१५४०९.

## १.३ व्याप्ती व मर्यादा.

महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुका ही या अभ्यास विषयाची व्याप्ती आहे. मोखाडा तालुका हा आदिवासी बहुल आणि अतिदुर्गम तालुका असून तालुक्यातील आदिवासी लोकसंख्येचे प्रमाण ९३ टक्क्यापेक्षा जास्त आहे. या शोधनिबंधात केवळ आदिवासी लोकांच्या अन्नाच्या सुरक्षिततेवर प्रकाश टाकण्यात आला आहे. ही या शोधनिबंधाची मर्यादा आहे.

## १.४ संशोधन पध्दती.

प्रस्तुतचा शोधनिबंध हा प्राथमिक आणि दुय्यम साधन सामग्रीवर आधारित आहे.ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यात महादेव कोळी, ढोर कोळी, कातकरी, वारली, कोकणा, म ठाकूर आणि क ठाकूर अशा विविध सात आदिवासी जमाती असून या विविध जमातीतील प्रत्येकी ६० या प्रमाणे ४२० कुटुंबाची निवड करुन त्यांची आर्थिक आणि सामाजिक पाहणी केली.

## विभाग दुसरा

## २.१ अन्नसुरक्षा म्हणजे काय ?

अन्नसुरक्षा किंवा अन्नाची सुरक्षितता या संकल्पनेच्या काही व्याख्या पुढीलप्रमाणे स्पष्ट केल्या आहेत.

१) **अन्न आणि कृषी संघटना.** "सर्व लोकांना सर्व काळ त्यांना लागणाऱ्या अन्नाविषयक गरजा भागविण्यासाठी भौतिक व आर्थिक उपलब्धतेची दिलेली हमी म्हणजे अन्नाची सुरक्षितता होय."

२) **स्टॅटझ.** "दीर्घकाळापर्यंत देशातील सर्व लोकसंख्येला वेळाच्या वेळी, खात्रीशीर आणि आहाराच्या सकसतेच्या दृष्टीने पुरेसा अन्नपुरवठा होऊ शकेल अशा अन्न पध्दतीची हमी म्हणजे अन्नाची सुरक्षितता होय."

३) **जागतिक विकास अहवाल (१९८६)** "सर्व लोकांना वर्षाचे बाराही महिने सक्रिय राहून आरोग्यदायी आयुष्य जगण्यासाठी पर्याप्त अन्न मिळणे म्हणजेच अन्नाची सुरक्षितता होय."

**२.२ अन्नसुरक्षेचे घटक.** अन्न सुरक्षेचे प्रमुख घटक खालीलप्रमाणे आहेत.

### १) अन्नाधान्याची उपलब्धता.

देशातील सर्व लोकांना पुरेल एवढे अन्नधान्य देशात उपलब्ध असेल तर देशातील लोकांना अन्नाची सुरक्षितता प्राप्त होते.

### २) अन्नातील पोषक घटक.

अन्नाची सुरक्षितता केवळ अन्नाच्या उपलब्धतेवर अवलंबून नसते. तर अन्नातील पोषक घटकावरही अवलंबून असते. अन्नाचा किंवा आहाराचा दर्जा

निकृष्ट असेल, सकस अन्न लोकांना मिळत नसेल तर लोक अन्नाच्या सुरक्षिततेपासून वंचित आहेत, असेच म्हणावे लागते.

**३) लोकांची खरेदीशक्ती.**

देशातील लोकांच्या खरेदी शक्तीवरही अन्नाची सुरक्षितता अवलंबून असते. आपला देश अन्नधान्याच्या बाबतील स्वयंपूर्ण आहे. परंतु सुमारे २५ कोटी लोकांची खरेदीशक्ती कमी असल्याने ते देशात अन्नधान्य उपलब्ध असूनही खरेदी करु शकत नाहीत. त्यामुळे ते अन्नाच्या सुरक्षिततेपासून वंचित आहेत.

**२.३ अन्नसुरक्षिततेच्या अवस्था.**

देशातील लोकांना वर्षभर अन्नधान्याची उपलब्धता असणे म्हणजे अन्नाची सुरक्षितता नव्हे. तर, लोकांना कायमपणे निरोगी किंवा रोगमुक्त जीवन जगता येईल असे पोष्टिक अन्न मिळाले पाहिजे. त्यांना अन्नाधान्या बरोबरच डाळी, कडधान्ये, दूध, अंडी आणि मटण सुध्दा मिळाले पाहिजे. अशा प्रकारे अन्न सुरक्षिततेचा व्यापक अर्थ सांगितला जातो. अन्न सुरक्षेच्या खालील चार अवस्थावरुन आपणास ही संकल्पना किती व्यापक आहे, ते लक्षात येते.

**१) पहिली अवस्था.**

अन्नधान्याची पुरेशी उपलब्धता.

**२) दुसरी अवस्था.**

अन्नधान्ये आणि डाळी यांची पुरेशी उपलब्धता

**३) तिसरी अवस्था.**

अन्नधान्ये, डाळी, दूध आणि दूधाचे पर्दाथ, मटण, अंडी मासे, फळे आणि भाजीपाला.

**४) चवथी अवस्था.**

अन्नधान्ये, डाळी, दूध, दूधाचे पदार्थ, मटण, अंडी, मासे, फळे आणि भाजीपाला. अशा प्रकारे लोकांना केवळ वर्षभर ज्वारी, बाजरी, तांदूळ, डाळी यांची उपलब्धता झाली म्हणजे त्यांना अन्नाची सुरक्षितता प्राप्त झाली असे म्हणता येणार नाही. कारण आहारात दूध, मासे, अंडी, मटण, फळे व भाजीपाला असल्याशिवाय मनुष्याच्या शरीराची वाढ चांगली होत नाही. आहारात दूध, अंडी, डाळी, इत्यादी घटक पुरेशा प्रमाणात नसतील तर सततचे आजारपण, कुपोषण, अकाली वार्धक्य येणे या समस्यांना मनुष्याला तोंड द्यावे लागते. म्हणून अन्न सुरक्षिततेचा अर्थ अत्यंत व्यापक असून मनुष्यला पुरेसा आणि पौष्टिक आहार मिळाल्याशिवाय त्याला अन्नाची सुरक्षितता प्राप्त झाली असे म्हणता येणार नाही.

**२.४ अन्नाच्या सुरक्षिततेसाठी सरकारने योजलेले उपाय -**

भारतातातील कोटयावधी लोक आजही अन्नाच्या सुरक्षिततेपासून वंचित आहेत. या लोकांना अन्नाची सूरक्षितता लाभावी यासाठी भारत सरकार पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून प्रयत्न करीत आहे. अन्नाच्या सुरक्षिततेसाठी भारत सरकार

योजत असलेले प्रमुख उपाय थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

## १) सार्वजनिक वितरण व्यवस्था.

वाढत्या किंमती हा खाजगी वितरण व्यसस्थेतील प्रमुख दोष होता. त्यामुळे देशातील बहुसंख्य लोकांना अन्नधान्य पुरेशा प्रमाणात विकत घेता येत नव्हते. म्हणून स्वातंत्र्यानंतर १९६० च्या सुमारास भारत सरकारने देशात सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरु केली. त्यानुसार गरीबांसाठी **'सरकार मान्य स्वस्त धान्य दुकाने'** उघडली. या दुकानामार्फत लोकांना अन्नधान्ये, डाळी, साखर, तेल इत्यादी वस्तूंचा रास्त दरात पुरवठा केला जातो. सन २००० मध्ये देशातील सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानांची संख्या ४,६१,००० इतकी होती. खालील तक्त्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण दर्शविलेले आहे.

**तत्का क्रमांक - १**

**सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण**

| अ.क्र | घटक | सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण(टक्केवारी) | |
|---|---|---|---|
| | | ग्रामीण लोकसंख्या | शहरी लोकसंख्या |
| १ | तांदूळ | १४ टक्के | ३९ टक्के |
| २ | गहू | २६ टक्के | ३७ टक्के |
| ३ | केरोसिन | ४४ टक्के | ६४ टक्के |
| ४ | साखर | ३६ टक्के | ७६ टक्के |
| ५ | खाद्यतेल | ११ टक्के | २७ टक्के |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर अवलंबून असणाऱ्या एकूण लोकसंख्येत ग्रामीण लोकसंख्येत ग्रामीण लोकसंख्येपेक्षा शहरी लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे. तसेच तांदूळ, गहू आणि खाद्यतेलापेक्षा साखर आणि केरोसिनसाठी सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर अवलंबून राहणाऱ्या लोकांचे प्रमाण खूप जास्त आहे.

## २) विविध रोजगार योजना.

बेरोजगारीमुळे खरेदीशक्ती कमी राहते. त्यामुळ खुल्या बाजारात किंवा सरकारी धान्य दुकानात अन्नधान्ये उपलब्ध असूनही ते विकत घेता येत नाही. त्यामुळे अन्नाची सुरक्षितता प्राप्त होत नाही. म्हणून स्वातंत्र्यानंतर सरकारने ग्रामीण आणि शहरी बेरोजगारांना वर्षातील किमान दिवस रोजगार मिळावा आणि त्यांची खरेदीशक्ती वाढावी यासाठी विविध रोजगार योजना

आखून त्यांची अंमलबजावणी केली. उदाहरणार्थ वीस कलमी कार्यक्रम, ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी योजना, ट्रायसेम, ग्रामीण विकासाचा धडक कार्यक्रम, अंत्योद्यय योजना, जवाहर रोजगार योजना, पंतप्रधान एकात्मिक शहरी दारिद्रय, निर्मूलन कार्यक्रम एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, पंतप्रधान रोजगार योजना, स्वर्णजंयती ग्राम स्वयंरोगार योजना आणि अन्नपूर्णा योजना इत्यादी विविध योजनांची अमंलबजावणी देशात चालू आहे.

## तिसरा विभाग

## आदिवासींच्या अन्नाच्या सुरक्षिततेचा अभ्यास

शोधनिंबधाच्या या तिसऱ्या भागात महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हयातील मोखडा तालुक्यातील आदिवासींच्या अन्नाच्या सुरुक्षितेतची माहिती दिली आहे. मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित आदिवासी कुटूंबापैकी किती कुटूंबे अन्नाच्या सुरक्षिततेपासून वंचित आहेत आणि आदिवासी लोकांच्या अन्नाच्या असुरक्षिततेस कोणते घटक जबाबदार आहेत याची माहिती दिली आहे.

## आदिवासींच्या अन्नाच्या असुरक्षिततेचे निकष.

ज्या लोकांना अन्नाचा तुटवडा जाणवतो, ज्या लोकांच्या अन्नाचा दर्जा निकृष्ट आहे आणि ज्या लोकांना अन्नधान्याच्या खरेदीसाठी कर्ज काढावे लागते ते लोक अन्नाच्या बाबतीत असुरक्षित आहेत असे प्रस्तुत अभ्यासकाचे मत आहे. या निकषानुसार प्रस्तुत अभ्यासकाने सर्व्हेक्षण केलेल्या ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यातील किती आदिवासी कुटूंबे अन्न सुरक्षिततेपासून वंचित आहेत याची माहिती शोधनिबंधाच्या या भागत दिली आहे

### १. अन्नाचा तुटवडा.

खालील तक्यात ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित आदिवासी कुटुंबापैकी किती कुटूंबाना दरवर्षी तीन ते चार महिने अन्नाचा तुटवडा जाणवता आणि त्यामुळे उपाशी व अर्धपोटी रहावे लागते, याची माहिती दिली आहे

**तक्ता क्रमांक -२**

**अन्नाचा तुटवडा भासणाऱ्या आदिवासी कुटूंबाचे प्रमाण**

| सर्व्हेक्षणाचे वर्ष | सर्व्हेक्षित तालुका | जिल्हा | सर्व्हेक्षित आदिवासी जमात | सर्व्हेक्षित आदिवासी कुटूंबांची संख्या | अन्नाचा तुटवडा भासणाऱ्या आदिवासी कुटूंबाची संख्या | अन्नाचा तुटवडा भासणाऱ्या आदिवासी कुटूंबांचे शेकडा प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|---|---|---|
| २००४ | मोखाडा | ठाणे | सात | ४२० | ३१६ | ७५.२४ |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटूंबापैकी ३१६ कुटूंबे (७५.२४ टक्के) अन्नाच्या बाबतीत असुरक्षित आहेत. कारण या कुटूंबांना वर्षातील तीन ते चार महिने अन्नाचा तुटवडा जाणवतो. त्यामुळे त्यांची भयंकर उपासमार होते.

## २. अन्नाचा निकृष्ट दर्जा.

जरी एखाद्या व्यक्तीला वर्षभर पुरेसे अन्न मिळत असेल आणि ते अन्न जर निकृष्ट दर्जाचे असेल तर त्या व्यक्तीचे पोषण व्यवस्थित होत नाही.म्हणून अशा व्यक्ती अन्नाच्या सुरक्षिततेपासून वंचित आहेत असेच म्हटले पाहिजे. म्हणून मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षण केलेल्या ४२० आदिवासी कुटूंबापैकी किती कुटूंबे अन्नाच्या बाबतीत असुरक्षित आहेत हे पाहण्यासाठी प्रस्तुत अभ्यासकाने 'अन्नाचा निकृष्ट दर्जा' हा निकष विचारात घेतला आहे. सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटूंबापैकी किती कुटूंबाना वर्षभर पुरेसे अन्न मिळते? आणि त्यापैकी किती कुटुंबाच्या अन्नाचा दर्जा निकृष्ट आहे? या बाबींची माहिती खालील तक्त्यात दिली आहे.

### तक्ता क्रमांक -३

| सर्व्हेक्षणाचे वर्ष | सर्व्हेक्षित तालुका | जिल्हा | सर्व्हेक्षित आदिवासी जमाती | सर्व्हेक्षित आदिवासी कुटूंबांची संख्या | अन्नाचा तुटवडा भासणाऱ्या आदिवासी कुटूंबाची संख्या | अन्नाचा तुटवडा न भासणाऱ्या कुटूंबांची संख्या | अन्नाचा तुटवडा न भासणाऱ्या कुटुंबापैकी अन्नाचा दर्जा चांगला असणाऱ्या कुटुबांची संख्या | अन्नाचा तुटवडा न भासणाना कुटंबापैकी अन्नाचा दर्जा निकृष्ट असणाऱ्या कुटुंबाची संख्या | अन्नाचा दर्जा निकृष्ट असणाऱ्या कुटुंबाचे शेकडा प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २००४ | मोखाडा | ठाणे | सात | ४२० | ३१६ | १०४ | २६ | ७८ | ७५.०० |

कुटूंबाना म्हणजे २४.७६ टक्के कुटुंबांना अन्नाचा तुटवडा भासत नाही. परंतु या १०४ कुटूंबापैकी केवळ २६ कुटुंबांच्या (२५.०० टक्के) अन्नाचा दर्जा चांगला आहे. तर ७८ कुटुंबांच्या (७५.०० टक्के) अन्नाचा दर्जा चांगला नाही. म्हणून अन्नाचा तुटवडा न भासणाऱ्या १०४ कुटुंबापैकी ७५.०० टक्के आदिवासी कुटुंबे अन्नाचा सुरक्षिततेपासून वंचित आहेत, अशा निकृष्ट निघतो.

## अन्नधान्याच्या खरेदीसाठी कर्ज.

प्रस्तुत अभ्यासकाने नोकरीच्या निमित्ताने आदिवासी भागात अनेक वर्षे वास्तव्य केले आहे. या वास्तव्यात त्यास असे आढळले की, बहुसंख्य आदिवासींना

जगण्यासाठी म्हणजेच अन्नधान्य विकत घेण्यासाठी मोठया शेतकऱ्यांकडून आणि आदिवासी विकास महामंडळाकडून खावटीच्या स्वरुपात कर्ज घ्यावे लागते. म्हणून ज्या आदिवासींना जगण्यासाठी असे कर्ज काढावे लागते, ती आदिवासी कुटुंबे अन्न सुरक्षिततेपासून वंचित आहेत, असे मानले पाहिजे. खालील तक्त्यात किती आदिवासी कुटुंबांना दरवर्षी जगण्यासाठी कर्ज काढावे लागते, याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक -४**

| सर्व्हेक्षणाचे वर्ष | सर्व्हेक्षित तालुका | जिल्हा | सर्व्हेक्षित आदिवासी जमाती | सर्व्हेक्षित आदिवासी कुटूंबांची संख्या | अन्नधान्य खरेदीसाठी कर्ज काढलेल्या आदिवासी कुटुंबांची संख्या | अन्न धान्य खरेदीसाठी कर्ज काढलेल्या कुटंबांचे प्रमाण (टक्के) |
|---|---|---|---|---|---|---|
| २००४ | मोखाडा | ठाणे | सात | ४२० | ३३९ | ८०.८१ |

**अन्नाचा दर्जा निकृष्ट असणाऱ्या आदिवासी कुटूंबांचे प्रमाण**

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी ३३९ कुटुंबे अन्नाच्या बाबतीत असुरिक्षत आहेत. कारण या कुटुंबांना दरवर्षी जगण्यासाठी म्हणजेच अन्नधान्य विकत घेण्यासाठी कर्ज काढावे लागते. कर्ज काढल्याशिवाय ही कुटुंबे जगूच शकत नाहीत. म्हणून कर्जाशिवाय जगूच न शकणारी आदिवासी कुटुंबे अन्न सुरक्षिततेपासून वंचित असतात, असा निष्कर्ष निघतो.

**३.३ अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील अन्नाची सुरक्षितता नसलेल्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण-**

अन्नाचा तुटवडा भासणारी कुटुंबेच केवळ अन्नाच्या सुरक्षिततेपासून वंचित असतात, असे नाही. तर ज्यांना वर्षभर अन्न मिळते त्यांच्या अन्नाचा दर्जा निकृष्ट आहे त्यांना सुध्दा अन्नाच्या सुरक्षिततेपासून वंचित असणारे लोक असेच म्हटले पाहिजे. म्हणून अन्नाची सुरुक्षितता नसलेल्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण अभ्यासण्यासाठी प्रस्तुत अभ्यासकाने अन्नाचा तुटवडा भासणारी कुटुंबे आणि ज्यांना अन्नाची टंचाई भासत नाही, परंतु ज्यांच्या अन्नाचा दर्जा निकृष्ट आहे अशा कुटुंबांचा एकत्रित विचार केला आहे. पुढील तक्त्यात ही बाब दर्शविली आहे.

### तक्ता क्रमांक - ५

### अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील अन्नाची सुरक्षितता नसलेल्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण

| अन्नाचा तुटवडा भासणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या + अन्नाचा निकृष्ट दर्जा असणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या | सर्व्हेक्षित कुटुंबांची संख्या | अन्नाची सुरक्षितता नसलेल्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण (टक्के) |
|---|---|---|
| ३१६ + ७८ = ३९४ | ४२० | ९३.८० |

तक्ता क्र.५ वरुन असे दिसते की, अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी ३९४ कुटुंबांना म्हणजे ९३.८० टक्के कुटुंबांना अन्नाची सुरक्षितता नाही.कारण यापैकी ३१६ आदिवासी कुटुंबांना दरवर्षी अन्नाचा तुटवडा भासतो. तर ७८ कुटुंबांच्या अन्नाचा दर्जा चांगला नाही.

**आदिवासींच्या अन्नाच्या असुरक्षिततेस जबाबदार घटक -**

लोकांच्या अन्नाच्या असुरक्षितता कशावरुन ठरवायची हे पाहिल्यानंतर आता अन्नाच्या असुरक्षिततेची कारणे पाहणे आवश्यक आहे. या ठिकाणी सर्व्हेक्षित मोखाडा तालुक्यातील आदिवासी अन्नाच्या बाबतीत का असुरुक्षित आहेत, याची कारणमीमांसा दिली आहे.

**१) दारिद्रय - :**

दारिद्रयामुळे साधा आहार सुध्दा पोटभर आणि वर्षभर लोकांना मिळत नाही. दारिद्रयामुळे अन्नाच्या बाबतीत असुरक्षितता निर्माण होते. थोडक्यात, दारिद्रय हे लोकांच्या अन्नाच्या असुरक्षिततेचे मुख्य कारण आहे.

### तक्ता क्रमांक - ६

### मोखाडा तालुक्यातील दारिद्रयरेषेखालील आदिवासी कुटुंबांचे प्रमाण

| सर्व्हेक्षणाचे वर्ष | सर्व्हेक्षित तालुका | जिल्हा | सर्व्हेक्षित आदिवासी जमाती | सर्व्हेक्षित आदिवासी कुटुंबांची संख्या | दारिद्रय रेषेखालील आदिवासी कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|---|---|
| २००४ | मोखाडा | ठाणे | सात | ४२० | ३४० | ८०.९५ |

तक्ता क्र. ६ मध्ये प्रस्तुत अभ्यासकाने सर्व्हेक्षण केलेल्या ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यातील महादेव कोळी,ढोर कोळी, कातकरी, वारली, कोकणा, म ठाकूर आणि क ठाकूर या सात जमातीतील ४२० आदिवासी कुटुंबांपैकी किती कुटुंबे दारिद्रय रेषेखाली आहेत, याची माहिती दिली आहे.

तक्ता क्र ६ वरुन असे दिसते की, मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी ३४० कुटुंबे (८०.९५) दारिद्रय रेषेखालील आहेत. दारिद्रय रेषेखाली राहणारे लोक म्हणजे अन्नाच्या सुरक्षिततेपासून वंचित असलेले लोक होय.

**कुटुंबाचा मोठा आकार -:**

कुटूंबाचा आकार आणि कुटूंबाची अन्नाची सुरुक्षितता या दोहोंचा अत्यंत जवळचा संबंध आहे. कुटूंबाचा आकार जितका मोठा तितका अन्नसुरक्षेचा प्रश्न गंभीर बनतो. कारण ज्या कुटूंब प्रमुखाचे वय ३० ते ३५ वर्षापर्यंत असते, त्या कुटूंब प्रमुखाला असलेली एक ते सहा अपत्ये ही वयाने खूप लहान असतात ही सर्व अपत्ये १५ वर्षापर्यंतच्या वयाची असतात. आणि ती कमवती नसतात. त्यामुळे कुटुंबातील सर्वांना वर्षभर पुरेसे अन्न मिळू शकत नाही. खालील तक्त्यात मोखाडा तालूक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटूंबापैकी किती कुटूंबे लहान आकाराची आहेत ? व किती कुटुंबे मोठया आकाराची आहेत ? याची माहिती दिली आहे. तसेच आदिवासी कुटूंबाची सरासरी आकारही दर्शविला आहे.

## तक्ता क्रमांक - ७

## मोखाडा तालुक्यातील आदिवासी कुटूंबाचे आकारमान आणि कुटूंबाचा सरासरी आकार

| सर्व्हेक्षणाचे वर्ष | सर्व्हेक्षित तालुका | जिल्हा | सर्व्हेक्षित आदिवासी जमाती | सर्व्हेक्षित आदिवासी कुटुंबाची संख्या | लहान आकाराच्या आदिवासी कुटुंबाची संख्या | मोठया आकाराच्या आदिवासी कुटूंबांचे प्रमाण | लहान आकाराच्या आदिवासी कुटूंबांचे प्रमाण | मोठया आकाराच्या आदिवासी कुटूंबाचे प्रमाण | सर्व्हेक्षित आदिवासी कुटूंबातील एकूण सदस्य संख्या | आदिवासी कुटूंबाचा सरासरी आकार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २००४ | मोखाडा | ठाणे | सात | ४२० | १५० | २७० | ३५.७२ | ६४.२८ | २३२५ | ५.५३ |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबामध्ये लहान आकाराच्या कुटुंबांपेक्षा (३५.७२ टक्के) मोठया आकाराच्या कुटुंबाचे प्रमाण जास्त आहे (६४.२८ टक्के) तर, आदिवासी कुटूंबाचा सरासरी आकार ५.५३ एवढा मोठा आहे

**२) अत्यल्प मजुरी -:**

आदिवासींना मिळणारी मजुरी अत्यल्प असल्याने त्यांच्या अन्न सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. सर्व्हेक्षित मोखाडा तालुक्यातील आदिवासींना त्यांच्या भागात शेती क्षेत्रात रोज सरासरी २५ ते ३० रुपये मजुरी आणि एक वेळचे जेवण दिले जाते. सरकारच्या रोजगार योजनेत आणि परगावी स्थलांतराच्या ठिकाणी रोज ५० ते ६० रुपये मजुरी मिळते. महागाईच्या विचार करता ही मजुरी अत्यल्प आहे. त्यामुळे आपला आदिवासी बांधव वर्षभर पोटभर जेऊ शकत नाही. खालील तक्त्यात सन २००३-२००४ या सर्व्हेक्षणाच्या वर्षातील आदिवासी मजुर कुटुंबांना मिळालेले प्रतिकुटुंब सरासरी मजुरीचे उत्पन्न दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक - ८**

**मोखाडा तालुक्यातील आदिवासींचे प्रतिकुटूंब वार्षिक सरासरी मजुरीचे उत्पन्न**

**(सन २००३-०४)**

| सर्व्हेक्षणाचे वर्ष | सर्व्हेक्षित तालुका | जिल्हा | सर्व्हेक्षित आदिवासी जमात | सर्व्हेक्षित आदिवासी कुटुंबांची संख्या | मजूर कुटूबांची संख्या | मजुरीचे प्रमाण | प्रतिकुटूंब वार्षिक सरासरी मजुरीचे उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २००४ | मोखाडा | ठाणे | सात | ४२० | ३८६ | ६१७९०७५ | १६००८ |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी ३८६ कुटुंबे ही मजुर कुटूंबे असून या कुटुंबांना सन २००३-२००४ या सर्व्हेक्षणाच्या वर्षात एकूण ६१७९०७५ रुपये एवढी मजुरी मिळाली होती. त्यामुळे प्रतिकुटूंब सरासरी मजुरीचे उत्पन्न १६००८ रुपये एवढे अल्प पडते. अशा प्रकारे मजुरीचे उत्पन्न अल्प असल्याने आदिवासी लोकांच्या अन्नाच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

**३) बेरोजगारी :-**

लोकांना वर्षभर पुरेसा आणि खात्रीचा रोजगार उपलब्ध असेल तर त्यांना अन्नाची सुरक्षितता प्राप्त होते. परंतु वर्षातील अनेक दिवस बेरोजगार राहण्याची पाळी येत असेल तर पुरेसे अन्न तर मिळत नाही. उलट वर्षातील काही दिवस उपाशी

व अर्धपोटी राहावे लागते. ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या सर्व्हेक्षणात आदिवासींना वर्षातील अनेक दिवस बेरोजगार राहावे लागते असे आढळून आले. मोखाडा तालुक्यातील आदिवासींना वर्षातील सरासरी १३३ दिवस रोजगार मिळतो. तर,२०० पेक्षा जास्त दिवस बेकारीच्याप्रश्नाला तोंड द्यावे लागते. खालील तक्त्यात मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी किती कुटुंबांना बेकारीच्या प्रश्नाला तोंड द्यावे लागते, याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक - ९**

**मोखाडा तालुक्यातील वर्षातील २०० पेक्षा जास्त दिवस बेकार रहावे लागणाऱ्या आदिवासी कुटूंबांचे प्रमाण**

| सर्व्हेक्षणाचे वर्ष | सर्व्हेक्षित तालुका | जिल्हा | सर्व्हेक्षित आदिवासी जमात | सर्व्हेक्षित आदिवासी कुटुंबांची संख्या | बेकारीचा प्रश्न भेडसावणाऱ्या आदिवासी कुटूंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| २००४ | मोखाडा | ठाणे | सात | ४२० | ३८७ | ९२.१४ |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी ३८७ कुटूंबांना म्हणजे ९२.१४ टक्के कुटुंबे अन्न सुरक्षिततेपासून वंचित आहेत. असे म्हणता येते. काम करण्याची इच्छा असूनही आदिवासींना काम मिळत नाही. त्यामुळे बेरोजगारीच्या काळात जंगलातील कंदाचे गडडे, झाडपाला आणून शिजवून खावा लागतो.

### ४) भूमिहीन व निकृष्ट शेतजमीन :-

भूमिहीनता आणि तुटपुंजी निकृष्ट शेती यामुळे आपल्या देशातील आदिवासी अन्नाच्या सुरक्षिततेपासून वंचित आहेत. बहुसंचय आदिवासींची शेतजमिन निकृष्ट असल्याने एखाद्या कुटुंबाकडे सहा एकर कोरडवाहू शेतजमीन असली तरी त्यापासून कुटुंबाची उपजीविका होत नाही. म्हणून सहा एकरा पेक्षा कमी निकृष्ट शेती असणारी आदिवासी कुटुंबे अन्नाच्या सुरक्षिततेपासून वंचित असतात. खालील तक्त्यात ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यातील भूमिहीन आणि सहा एकरपेक्षा कमी निकृष्ट शेती असणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण दर्शविले आहे.

## तक्ता क्रमांक - १०

### भूमिहीनता आणि सहा एकर पेक्षा कमी निकृष्ट शेती असणाऱ्या आदिवासी कुटूंबांचे प्रमाण

| सर्व्हेक्षणाचे वर्ष | सर्व्हेक्षित तालुका | जिल्हा | सर्व्हेक्षित आदिवासी जमाती | सर्व्हेक्षित आदिवासी कुटुंबांची संख्या | भूमिहीन आणि सहा एकर पेक्षा कमी शेतजमीन असणाऱ्या आदिवासी कुटूंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| २००४ | मोखाडा | ठाणे | सात | ४२० | ३७४ | ८९.०४ |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी ३७४ कुटुंबे म्हणजे कुटुंबाना वर्षातील ८९.०४ टक्के कुटुंबे भूमिहीन आणि सहा एकरापेक्षा कमी निकृष्ट शेतजमिन असणारी आहेत. भूमिहीनतेमुळे आणि तुटपुंज्या व निकृष्ट शेतीमुळे आदिवासींना वर्षभर पुरेसे व चांगले अन्न खावयास मिळत नाही. म्हणून 'भूमिहीनता व सहा एकर पेक्षा कमी शेतजमीन ' हे अन्नाच्या असुरक्षिततेचे प्रमुख कारण आहे.

## तक्ता क्रमांक - ११

### मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या शेतीची उत्पादकता

| सर्व्हेक्षणाचे वर्ष | सर्व्हेक्षित तालुका | जिल्हा | सर्व्हेक्षित आदिवासी जमात | सर्व्हेक्षित आदिवासी कुटूंबाची संख्या | आदिवासी शेतकरी कुटूंबाची संख्या | जमिनीचे एकूण क्षेत्रफळ (एकर) | जमिनीचे एकूण क्षेत्रफळ (हेक्टर ) | झालेले एकूण उत्पादन (क्विंटल) | प्रति हेक्टरी कृषी उत्पादकता (क्विंटल) | दर एकरी कृषी उत्पादकता (क्विंटल) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २००४ | मोखाडा | ठाणे | सात | ४२० | ३२१ | १४६८ | ५८७.२० | ३०७७ | २.०९ | ५.२४ |

वरील तक्त्यावरुन असे दिसते की, सर्व्हेक्षित मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या शेतीची उत्पादकता दर एकरी ५.२४ क्विंटल एवढी अल्प आहे. प्रति हेक्टरी कृषी उत्पादकता २.०९ क्विंटल एवढी आहे.

**५) शेतीची अल्प उत्पादकता -:**

शेतीची उत्पादकता अल्प असेल तर संबंधित शेतकरी कुटंबे अन्नाच्या सुरक्षिततेपासून वंचित राहतातच. शिवाय अल्प उत्पादकतेमुळे एकूण कृषी उत्पादन अल्प राहून अन्य उपभोक्त्यांनाही पुरेसे अन्नाधान्य मिळत नाही. खालील तक्त्यात मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित आदिवासी कुटुंबांच्या शेतीची उत्पादकता दर्शविली आहे. अशा प्रकारे आदिवासींच्या शेतीची उत्पादकता अत्यंत अल्प असल्याने आदिवासींना अन्नाची सुरक्षितता प्राप्त झालेली नाही.

**६) सार्वजनिक वितरण व्यवस्था -:**

संपूर्ण देशभर सार्वजनिक वितरण व्यवस्था अस्तित्वात आहे. परंतु खरेदी शक्तीचा अभाव, सरकारी दुकानात निकृष्ट धान्य आणि इतर कारणामुळे जे गरज असतानाही सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ घेऊ शकत नाहीत, त्यांना वर्षातील काही दिवस उपाशी रहावे लागते. म्हणून आदिवासी भागात सरकारमान्य स्वस्त धान्य दुकाने असूनही त्यापासून कित्येक आदिवासींना अद्याप अन्नाची सुरक्षितता लाभलेली नाही. तक्त क्र १२ मध्ये विविध कारणामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ घेऊ न शकणाऱ्या आणि त्यामुळे अन्नाची सुरक्षितता प्राप्त न झालेल्या मोखाडा तालुक्यातील आदिवासी कुटूंबाचे प्रमाण दर्शविले आहे.

**तक्ता क्रमांक - १२**

**सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा नियमित लाभ घेऊ न शकणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण**

| सर्व्हेक्षणाचे वर्ष | सर्व्हेक्षित तालुका | जिल्हा | सर्व्हेक्षित आदिवासी जमात | सर्व्हेक्षित आदिवासी कुटुंबांची संख्या | सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा नियमित लाभ घेऊ न शकणाऱ्या कुटुंबांची संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| २००४ | मोखाडा | ठाणे | सात | ४२० | ३८७ ९२ | १४ |



R-30
6

तक्ता क्र १२ वरुन असे दिसते की, सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी ३८७ कुटुंबे विविध कारणामुळे सरकारी स्वस्त धान्य दुकानातील धान्य नियमित आणू शकत नाहीत. त्यामुळे वर्षातील काही दिवस आदिवासींना अन्नाच्या तुटवडयाला तोंड द्यावे लागते.

**७) व्यसनाधिनता -:**

लोकांना असणाऱ्या दारु आणि तंबाखू सारख्या व्यसनामुळे सुध्दा अन्नाची असुरक्षितता निर्माण होते. कारण लोकांना जे काही उत्पन्न मिळते. त्यातील काही भाग व्यसनावर खर्च झाल्यामुळे उपासमारीचा कालावधीच वाढतो. खालील तक्त्यात ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी किती कुटुंबांना दारु व तंबाखूचे व्यसन आहे आणि त्यांचा दारु तंबाखू वरील प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी खर्च किती आहे. यांची माहिती दिली आहे.

## तक्ता क्रमांक - १३

## मोखाडा तालुक्यातील दारु व तंबाखूचे व्यसन असणाऱ्या आदिवासी कुटूंबांचे प्रमाण

| सर्व्हेक्षण वर्ष | सर्व्हेक्षित तालुका | जिल्हा | सर्व्हेक्षित आदिवासी जमाती | सर्व्हेक्षित आदिवासी कुटूंबांची संख्या कुटुबांची | दारु व तंबाखूचे व्यसन असणाऱ्या कुटूंबांची संख्या | व्यसनाधिन कुटुंबांचे शेकडा प्रमाण | एकूण वार्षिक उपभोग खर्च (रुपये) | दारु व तंबाखू वरील एकूण वार्षिक खर्च (रु) | दारु व तंबाखू वरील प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी खर्च (रु) | दारु व तंबाखू वरील उपभोग खर्चाशी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २००४ | मोखाडा | ठाणे | सात | ४२० | ४११ | ९७.८५ | ९६५१८५० | १२९३०५० | ३०७९ | १३.३९ |

तक्ता क्र. १३ वरुन असे दिसते की, मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी ९७.८५ टक्के कुटुंबाना दारु व तंबाखू व्यसन आहे. या आदिवासी कुटुंबांचा दारु व तंबाखूचे व्यसन आहे. या आदिवासी कुटुंबांचा दारु व तंबाखूचे व्यसनावरील प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी खर्च ३०७९ रुपये इतका आहे. याचा अर्थ एका वर्षात एवढया पैशाचे अन्नधान्य आदिवासी विकत घेऊ शकत नाहीत. त्यामुळे आदिवासी अन्नाच्या सुरक्षिततेपासून वंचित आहेत.

**विभाग चौथा.**

**शोधनिबंधाचे प्रमुख निष्कर्ष.**

प्रस्तुत शोधनिबंधाचे प्रमुख निष्कर्ष खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

१) अभ्यासक्षेत्रातील ठाणे जिल्हयातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी ९३.८० टक्के कुटुंबे अन्नाच्या सुरक्षितेपासून वंचित आहेत. अन्नाच्या सुरक्षिततेपासून वंचित असणाऱ्या आदिवासी कुटुंबाचे प्रमाण खूप मोठे आहे.

२) मोखाडा तालुक्यात अन्नाचा तुटवडा भासणाऱ्या आदिवासी कुटुंबांचे प्रमाण ७५.२४ टक्के इतके आहे. अन्नाचा तुटवडा न भासणाऱ्या १०४ आदिवासी कुटुंबापैकी २६ आदिवासी कुटुंबांच्या अन्नाचा दर्जा चांगला आहे (२५.०० टक्के) तर ७८ आदिवासी कुटुंबांच्या अन्नाचा दर्जा चांगला नाही (७५.०० टक्के)

३) दारिद्रय हा अन्नाच्या असुरक्षिततेस कारणीभूत असणारा महत्त्वाचा घटक आहे. मोखाडा, तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी ३४० कुटुंबे (८०.९५ टक्के ) दारिद्रय रेषेखाली आहेत.

४) अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबामध्ये लहान आकाराच्या कुटुंबापेक्षा (३५.७२ टक्के) मोठया आकाराच्या कुटुंबांचे प्रमाण मोठे आहे (६४.२८ टक्के) कुटुंबाचा आकार आणि अन्नाची सुरक्षितता या दोन घटकांमध्ये जवळचे संबंध आहेत. ज्य कुटुंबांचा आकार मोठा असतो, ती कुटुंबे अन्नाच्या बाबतीत असुरक्षित असतात.

५) मोखाडा तालुक्यातील आदिवासी कुटुंबांना मिळणारी मजुरी अत्यल्प आहे. आदिवासी त्यांच्या तालुक्यातील रोज सरासरी २५ ते ३० रुपये मजुरी आणि एक वेळचे जेवण मिळते. सरकारी रोजगार योजनेत आणि परगावी स्थलांतराच्या ठिकाणी रोज सरासरी ५० ते ६० रुपये मजुरी मिळते. सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी ३८६ कुटुंबे मजूर कुटुंबे असून प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी मजुरीचे उत्पन्न १६००८ रुपये एवढे अल्प आहे. मजुरीचे दर अल्प असल्याने बहुसंख्य आदिवासी अन्नाच्या सुरक्षिततेपासून वंचित आहेत.

६) मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी ३८७ म्हणजे ९२.१४ टक्के कुटुंबांना वर्षातील २०० पेक्षा जास्त दिवस बेरोजगार रहावे लागत

असल्याने आदिवासींच्या अन्नाच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

७) अभ्यासक्षेत्रातील मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी ३७४ कुटुंबे म्हणजे ८९.०४ टक्के कुटुंबे भूमिहीन आणि सहा एकरपेक्षा कमी निकृष्ट शेतलमीन असणारी आहेत. आदिवासींना अन्नाची सुरक्षितता नसण्यास 'भूमिहीन व तुटपुंजी निकृष्ट शेतजमीन' हे घटक जबाबदार आहेत.

८) सर्व्हेक्षित मोखाडा तालुक्यातील आदिवासींच्या शेतीची उत्पादकता प्रति हेक्टरी २.०९ क्विंटल एवढी अल्प आहे. त्यामुळे शेती असणाऱ्या भूमिधारी आदिवासी कुटुंबापैकी बहुसंख्य कुटुंबांची शेतीपासून उपजीविका होत नाही. त्यामूळे त्यांना अन्नाच्या सुरक्षिततेपासून वंचित रहावे लागते.

९) मोखाडा तालुक्यतील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुंबापैकी ९२.१४ टक्के कुटुंबे अन्नाचा दर्जा निकृष्ट असणे, खरेदी शक्तीचा अभाव, वाईट वागणूक इत्यादी कारणामुळे सरकारी स्वस्त धान्य दुकानातील धान्य नियमित आणू शकत नाहीत.

१०) मोखाडा तालुक्यतील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुबापैकी ९७.८५ टक्के कुटुंबातील व्यक्तींना दारु व तंबाखूचे व्यसन आहे. आदिवासींचा दारु व तंबाखू वरील प्रतिकुटुंब वार्षिक सरासरी खर्च ३०७९ रुपये इतका आहे. आदिवासींच्या व्यसनाधिनतेमुळे सुध्दा आदिवासी अन्नाच्या सुरक्षिततेपासून लांब आहेत.

## ४.२ अन्नाची सुरक्षितता प्राप्त व्हावी यासाठी शिफारसी.

बहुसंख्य आदिवासी अन्नाच्या सुरक्षिततेपासून वंचित आहेत. अशा आदिवासींना अन्नाची सुरक्षितता प्राप्त व्हावी यासाठी काही शिफारशी प्रस्तुत अभ्यासकाने खालीलप्रमाणे सुचविल्या आहेत.

१) प्रत्येक लहान-मोठया गावात धान्य पेढया स्थापन करणे, या धान्य पेढयातुन गरजुंना बिनव्याजी धान्य पुरविणे.

२) सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानातुन आदिवासींना पुरेसा व चांगल्या दर्जाच्या अन्नधान्यांचा, डाळींचा पुरवठा करणे.

३) दारुडया लोकांना शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित ठेवणे,यामुळे दारुवरील खर्च घटून अन्नधान्य खरेदीसाठी तो पैसा खर्च केला जाईल.

४) आदिवासीं कुटुंबाना आकार लहान ठेवण्यास उदयुक्त करणे. त्यांना लहान आकाराच्या कुटुंबाचे महत्त्व पटवून देणे. यामुळे कुटुंबातील अपत्यांची संख्या कमीत कमी राहून लहान व मोठया व्यक्तींना अन्नाचा तुटवडा भासणार नाही.

५) सरकारने आदिवासींच्या विकास योजनावरील खर्चात वाढ करणे आवश्यक

६) आदिवासी भागात हरित क्रांती घडवून आणणे.

७) दारिद्रय निमूर्लन आवश्यक त्याशिवाय आदिवासींची खरेदीशक्ती आणि अन्नाचा उपभोग वाढणार नाही.

८) आदिवासींच्या शेतीची उत्पादकता वाढविणे. तरच आदिवासी शेतकऱ्यांना वर्षभर अन्नधान्य पुरु शकेल.

९) सुक्या व ओल्या दुष्काळाचे दुष्परिणाम रोखण्यासाठी दरवर्षी प्रभावी उपाय योजना करणे.

१०) आदिवासींना वर्षभर हक्काचा कायमस्वरुपी रोजगार पुरविणे त्यांना पुरेशी किंवा योग्य मजुरी देणे.

११) जीवघेण्या महागाईवर नियंत्रण ठेवणे. पूर्वीचे स्वस्ताईचे युग आणणे. त्यामुळे आदिवासींना अन्नधान्य, डाळी, मासे इत्यादींचा पुरेसा उपभोग घेता येईल.

**समारोप -:**

आदिवासींची नक्षालवादी चळवळ किंवा हिंसक कारवयांची चळवळ निर्माण होण्यास जी काही प्रमुख कारणे आहेत त्यामुळे **'अन्नाची असुरक्षितता '** हे प्रमुख कारण आहे. म्हणून आदिवासींना अन्नाची सुरक्षितता प्राप्त करुन देणे आवश्यक आहे. वर्षातील काही दिवस आदिवासीनां जनावरांप्रमाणे झाडपाला खावा लागणे ही बाब संपूर्ण समाजाच्या स्वास्थाच्या दृष्टीने आणि माणूसकीच्या दृष्टीने योग्य नाही. म्हणून देशातील एकही मनुष्य अन्नाच्या सुरक्षिततेपासून वंचित राहणार नाही याची काळजी सरकारने घेतली पाहिजे.

* * *

**संदर्भ -:**


१. शोधनिबंध स्मरणिका, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे २६ वे अधिवेशन, नोव्हेबर २००२, वैद्यनाथ कॉलेज, परळी (बीड) पृ. क्र. ५९

२. तत्रैव, पृ. क्र. ५९

३. तत्रैव पृ. क्र. ५९


**इतर संदर्भ.**


१ शोधनिबंध स्मरणिका,मराठी अर्थशास्त्र परिषदेचे २६ वे अधिवेश, नोव्हेंबर २००२, वैद्यनाथ कॉलेज,परळी (बीड) पृ क्र ५९

२ इंगळे जयवंत शंकरराव, 'महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हयातील आदिवासींचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास' पीएच.डी, शिवाजी विद्यापीठ, ऑगस्ट, २००८.

३ इंगळे जयवंत शंकरराव, 'महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हयातील आदिवासींचा आर्थिक आणि तक्ता क्र ३ वरुन असे दिसते की, मोखाडा तालुक्यातील सर्व्हेक्षित ४२० आदिवासी कुटुबापैकी १०४ सामाजिक अभ्यास',पीएच.डी,
शिवाजी विद्यापीठ, ऑगस्ट, २००८.

४ इंगळे जयवंत शंकरराव, 'महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हयातील आदिवासींचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास', पीएच.डी, शिवाजी विद्यापीठ, ऑगस्ट, २००८.

५ इंगळे जयवंत शंकरराव, 'महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हयातील आदिवासींचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास' पीएच.डी, शिवाजी विद्यापीठ, ऑगस्ट, २००८

६ इंगळे जयवंत शंकरराव, 'महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हयातील आदिवासींचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास' पीएच.डी, शिवाजी विद्यापीठ, ऑगस्ट, २००८.

७ इंगळे जयवंत शंकरराव, 'महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हयातील आदिवासींचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास' पीएच.डी, शिवाजी विद्यापीठ, ऑगस्ट, २००८.

८ इंगळे जयवंत शंकरराव, 'महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हयातील आदिवासींचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास' पीएच.डी, शिवाजी विद्यापीठ, ऑगस्ट, २००८.

९ इंगळे जयवंत शंकरराव, 'महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हयातील आदिवासींचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास' पीएच.डी, शिवाजी विद्यापीठ, ऑगस्ट, २००८.

१० इंगळे जयवंत शंकरराव, 'महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हयातील आदिवासींचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास, पीएच.डी, शिवाजी विद्यापीठ, ऑगस्ट, २००८

११ इंगळे जयवंत शंकरराव, 'महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हयातील आदिवासींचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास' पीएच.डी, शिवाजी विद्यापीठ, ऑगस्ट, २००८

१२ इंगळे जयवंत शंकरराव, 'महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हयातील आदिवासींचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास' पीएच.डी, शिवाजी विद्यापीठ, ऑगस्ट, २००८.

१३ इंगळे जयवंत शंकरराव, 'महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हयातील आदिवासींचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास' पीएच.डी, शिवाजी विद्यापीठ, ऑगस्ट, २००८.

१४ इंगळे जयवंत शंकरराव, महाराष्ट्र राज्यातील ठाणे जिल्हयातील आदिवासींचा आर्थिक आणि सामाजिक अभ्यास पीएचडी प्रबंध, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, ऑगस्ट-२००८

* * *

# मुव्हमेंट अगेंन्स्ट एक्सक्ल्युजन फ्रॉम सिटीजनशीप : राईट २५ ईयर्स ऑफ नर्मदा बचाव आंदोलन

* राहुल एस. पाटणकर

सरदार सरोवराविरुध्द नागरिकांच्या हक्क अधिकारांसाठी नर्मदा बचाओ आंदोलनाने गेली २५ वर्षे जे योगदान दिलेले आहे. त्याचा आढावा मी प्रामुख्याने हया संशोधन पेपरमध्ये घेतलेला आहे. त्यात प्रस्तावना, वॉईस ऑफ प्रोटेस्टचा इतिहास, नर्मदा बचाव आंदोलन (एन.बी.ए) व आदिवासींची भूमिका, न्यायव्यवस्था व प्रशासनासंबंधी अभ्यासकांची मते, नोंदी आव्हाने, निष्कर्ष इ. मुद्दयांच्या आधारे केलेले आहे.

## १. प्रस्तावना :

स्टेट डेमोक्रॉसी आणि सिटीजनशीप हे तिन्ही घटक भारताच्या संविधानावर उभारलेले आहेत. १९५० मध्ये सर्व नागरिकांना समानतेचा अधिकार देणारी राज्यघटना स्विकारली गेली. भारताच्या संविधानानुसार सर्व नागरिक "समान" आहेत. मात्र अजूनही देशातील प्रस्थापित वर्गातील व्यक्ती सोडता बहुसंख्य जनता विशेषतः दलित, मागासवर्गीय, आदिवासी, शेतकरी, शेतमजूर व स्त्रिया हे स्वातंत्र्यापासून संसदीय लोकशाहीपासून व मूलभूत हक्क अधिकारांपासून वंचितच आहेत. हे आतापर्यंतच्या अनेकविध चळवळी व आंदोलनांनी सिध्द करुन दाखविले आहे.

## २. वॉईस ऑफ प्रोटेस्टचा इतिहास :

वॉईस ऑफ प्रोटेस्टची सुरुवात बघितली तर मॉन्टेस्क्यू, रुसो व व्हॉल्टेअर हया फ्रेंच विचारवंतांच्या लिखाणापासून प्रेरणा घेऊन उदयास आलेल्या फ्रेंच राज्यक्रांतीत प्रथमतः सापडतात. खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य, समता व बंधुता ही आधुनिक मुल्य सर्वत्र जगाला फ्रेंच राज्यक्रांतीतून मिळाली. त्यानंतरचा १८५७ चा उठाव असो, स्वातंत्र्यपूर्व भारतातील समाज सुधारणेचा लढा असो किंवा काल परवा झालेला इजिप्तचा लढा असो. हे सर्व उठाव, चळवळी, बंड आंदोलने वा लढे वॉईस ऑफ प्रोटेस्ट आहेत. जे कुठेतरी अन्याय, असंतोष इत्यादींना वाचा फोडत आहेत. सर्वच लढयांचे मुद्दे बघितले तर त्यात बरीच साम्य स्थळे आहेत . उदाहरणार्थ :- १. आम्हाला स्वातंत्र्य पाहिजे. २. समता पाहिजे.

व्याख्याता, समाजशास्त्र विभाग, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

३. आमचे मुलभूत हक्क अधिकार आम्हांला मिळाले पाहिजे. ४. आम्हाला आमचे निर्सगदत्त अधिकार मिळाले पाहिजेत. हे वॉईस स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्यनंतर देखील भारतात टिकून आहेत. हयावरुन मला असे वाटते की, भारतीय संसदीय लोकशाही समानता व सामाजिक न्याय देऊ शकलेली नाही. डॉ. आनंद तेलतुम्बडे म्हणतात की, खरच लोकशाही व्यवस्था समतेवर आधारित असती तर समतेसाठी सामाजिक न्यायाच्या संकल्पनेची गरजच नसती. मुळात सामाजिक न्यायाचीच संकल्पना

**३. नर्मदा बचाव आंदोलन (एन.बी.ए.) व आदिवासींची भूमिका :**

आपण विचार केला तर आपल्या लक्षात येते की, ज्या ज्या वेळेस नागरिकांचे लोकशाही हक्क नाकारले गेले आहेत. त्या त्या वेळेस ते मिळविण्यासाठी चळवळी, आंदोलने उदयास आल्या आहेत. त्यात प्रामुख्याने कामगार, मागासवर्गीय, दलित, आदिवासी, महिला व विद्यार्थी सांगता येतील. नर्मदा बचाओ आंदोलन देखील ह्यांपैकीच एक आहे, जे गेल्या २५ वर्षापासून लढा देत अहिंसक सत्याग्रहाचे सर्व नियम पाळत उभे आहे.

घनःश्याम म्हणतात की, महिला, पर्यावरण, व्यक्तीस्वातंत्र, शांतताप्रक्रिया विषयक चळवळी ळया नवसामाजिक चळवळी म्हणून ओळखाल्या जातात आणि मानवतावादी मुद्दा हा हया चळवळीचा गाभा असतो (२००८ पृ. क्र. ११) तर डॉ. श्रृती तांबे सामाजिक आंदोलन हया लेखात म्हणतात की, नवसामाजिक चळवळींचा गाभा नवे अन्वये सामाजिक आयुष्याची नवी रुपे व नव्या कृती निर्माण करण्याची क्षमता हा आहे. वरील अभ्यासकांच्या मांडणीवरुन मी अशी मांडणी केली आहे की नर्मदा बचाओ आंदोलन नवसामाजिक चळवळीच्या चौकटीत बसते कारण नर्मदा बचाओ आंदोलनाचे कृती कार्यक्रम हया मुद्दयाना धरुनच आहेत.

संजय संगवई म्हणतात की, १९७०-८० च्या दशकात अनेक संघर्ष पुढे आले. त्यातूनच प्रथम स्वातंत्र्य, समता व बंधुतेला अग्रक्रम दिली गेला. देशातील सत्ताधारी अभिजनांनी स्वीकारलेल्या धारणा व धोरणे आता कालबाहया झाली असून देशाला न्याय,समता, सर्वांचे स्वातंत्र्य यासाठी विकासाचा वेगळा मार्ग स्वीकारावा लागेल याकडे नव्या आंदोलनांनी लक्ष वेधले व शाश्वत विकासाची कास धरली (२०१० पृ. क्र. २०) तर अमिता बावीस्कर म्हणतात की, राज्यशासन पुरस्कृत विकास हा एकतर्फी आणि निसर्गला घातक आहे. नर्मदा बचाओ आंदोलनाने हया विकासाची चिकीत्सा केला व विकासाला व्यापक अर्थ प्राप्त करुन दिला आहे (१९९५ : क्र. २०.२९) खरे म्हणजे हया नव्या आंदोलनांनी विकासालाच आव्हान केले आहे हे आव्हान केले आहे हे आव्हान शासन आणि समाजाला एक धक्काच आहे.कारण आजवर विकासाच्या नावाने जे काय चालेले होते त्याला विरोध होत नव्हता. मात्र हया नव्या जनआंदोलनांनी विकास म्हणजेच रस्ते, उद्योग, रेल्वे इ. च नसून रोजगार, शिक्षण, आरोग्य इ. सुध्दा विकासातील महत्त्वाचे घटक आहेत. अशी मांडणी करावयला सुरुवात केली आहे.

नेहरु म्हटले होते की, "द पावर स्टेशन अन्ड द डॅम्स आर द टेम्पल ऑफ मॉडर्न इंडिया" त्यामुळे सरदार सरोवरला विरोध म्हणजेच विकासाला विरोध असे गृहीत धरले गेले. म्हणूनच नर्मदा बचाव

आंदोलनाला (एन.बी.ए) सतत विज्ञानविरोधी, विकासविरोधी व राष्ट्रविरोधी संबोधले गेले आहे. पुढे नेहरुंनीच अशा विकास प्रकल्पांना "भव्यतेचा रोग" संबोधले होते परंतु त्यावर विचार झालाच नाही. बचाव आंदोलनाची (एन. बी. ए) विकासाबाबतची भूमिका मात्र समजून घेतली गेली नाही.

**नर्मदा बचाव आंदोलन (एन.बी.ए) ने समाज आणि सरकारला काही मुलभूत प्रश्न विचारले आहेत:**

१. कुणाचा विकास कुणाचा बळी देऊन ?

२. विकास प्रकल्पांतून मिळणारी वीज सिंचन पेयजल कोणाला मिळणार व त्याचा प्राधान्यक्रम काय असणार ?

३. जर या प्रकल्पाने देशाचा विकासच होणार असेल तर त्यातला वाटा विस्थापितांना का नको ?

४. त्यांचा बळी घेतला जात आहे त्यांना हया तथाकथित विकासात का समाविष्ट केले जात नाही ?

५. सार्वजनिक हित म्हणजे नेमके कुणाचे ?

आतापर्यंतच्या विकास प्रकल्पांचा आढावा घेतल्यावर लक्षात येते की, आजवर आदिवासी, मागासवर्गीय व शेतकऱ्यांनाच विस्थापनाची सर्वात जास्त झळ बसलेली आहे व त्याचे लाभ मात्र शहरी औद्योगिक अर्थ कारणासाठी झाले आहेत. समाजातील या उपेक्षित वर्गाच्या हातची साधनसंपदा सार्वजनिक हित व राष्ट्र विकासाच्या नावावर काढून तिला पुन्हा सत्तासंपत्र समुहांच्या वा क्षेत्राच्या अतिरिक्त लाभासाठी वापरणे हा मला वाटते 'अंतर्गत वसाहतवादा' चाच प्रकार आहे.

आदिवासी म्हणतात की, नर्मदा खोऱ्यातील सुपीक जमीन प्रगत शेती ही सुध्दा देशाच्या प्रगतीचा व विकासाचा व विकासाचा भाग आहे. असा भाग धरणात बुडवणे हे "राष्ट्रीय पाप" आहे.

आमची संपदा संस्कृती हे सर्व राष्ट्राचा भाग नाही का ? शेवटी राष्ट्र म्हणजे कार्य ? व कुणाचे राष्ट्र ? असा प्रश्न ते विचारतात.

म्हणूनच मुठभर लोकांच्या विकासाला विरोध करण्यासाठी आदिवासी नर्मदा बचाव आंदोलनात (एन. बी. ए.) एकत्र आले आहेत. धरणे, मोर्चे, उपोषण, जल समर्पण इ. लोकशाही साधनांचा वापर करत आदिवासी विविध पातळयांवर लढा देत आहेत. तसेच सरकारशी संवाद साधने असेल, आणि विश्व बॅंक सारख्या बलाढय आंतरराष्ट्रीय संस्थेला प्रकल्पातुन माघार घ्यायला लावली. हे आंदोलनाचे फार मोठे यश आहे. सोबत सर्वोच्च न्यायालयात सहा वर्षे व्यवस्थेविरुध्द लढा देऊन देखील सर्वोच्च न्यायालय हे प्रस्थापित व्यवस्थेचा एक भाग आहे. हे त्याच्या निर्णयांनतर स्पष्ट होऊन देखील त्याच निर्णयाच्या आधारे विस्थापितांना त्यांचे न्याय हक्क मिळवून देण्यासाठी आंदोलन आजही उभे आहे. हे समाज परिवर्तनाच्या दृष्टिने फार मोठे यश आहे. तेव्हा प्रश्न पडतो की खरेच संसदीय लोकशाही अस्तित्वात आहे का ? न्यायव्यवस्था खरच तटस्थ आहे का ? हया प्रश्नासंबंधी अभ्यासकांची मते काय आहेत...

**४. न्यायव्यवस्था व प्रशासनासंबंधी अभ्यासकांची मते :**

योगेंद्र यादव, राजेंद्र व्होरा, अरुंधती रॉय व राजीव धवन सारखे अभ्यासक सर्वोच्च न्यायलयाच्या निकालासंदर्भात म्हणतात की,

१. यापुढे कुणीच सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठवणार नाहीत.

२. उच्चभ्रु समाजातून आलेले न्यायाधीश प्रस्थापितांच्या बाजूला कललेले असतात.

३. व्होरा म्हणतात की, सर्वोच्च न्यायालयाने हक्काच्या मुद्दयांपेक्षा विकासाला महत्त्व दिले आणि म्हणून हया सर्व परिस्थितीवरुन मी अशी मांडणी केली आहे की, एनबीए सारख्या जनआंदोलनाचे यशापयश हे धरण थांबणे का ? पुनर्वसन झाले का ? विकासधोरणे बदलली का ? या मुद्दयांवरुन ठरत नसून हया आंदोलनांमुळे गेली २५ वर्षे जे जनजागरण झाले. लोकांना आपले हक्क,अधिकार मागायचे बळ मिळावे आपण स्वतंत्र भारताचे नागरिक आहेत याची जाण झाली समाज आणि सरकारलाही विकासाची पुर्नव्याख्या करावी लागली व विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी आला. आणि त्या निमित्ताने समकालीन समजात जे नवे वॉईस उदयास आले ते म्हणजे १. डुंबेंगे पर नही हटेंगे. २. विकास चाहिये विनाश नही. ३. वारे सरकार तेरा कहना पर क्या खेती करना. ४. हमारे गॉव मे हमारा राज. ५. एकही नारा मांगेगे सातबारा. हयामुळे आंदोलन हे यशापशाच्या पलीकडे गेलेले असते. तेव्हा मला वाटते की चि वॉईस ऑफ प्रोटेस्ट आहेत. डॉ. धनागरे म्हणतात की, जनजागृतीचे फार मोठे काम नर्मदा बचाओ आंदोलन व चिपको आंदोलनांनी केलेले आहे अशा व सामाजिक चळवळीतून लोकशिक्षण देखील घडत असते. (२००५: पृ. क्र. ७४) व मला वाटते की ते खरेच आहे. कारण समुदाय सोडून इतरांशी संपर्कात नसणारा आदिवासी सरकारला प्रश्न विचारत आहे व केवळ आंदोलनामुळे शक्य झाले.

## ५. नोंदी वा निरीक्षणे :

१. खरे पाहता आदिवासी हे भारत भूमीचे मूळ रहिवासी आहेत. परंतु त्यांनाच "अतिक्रमणदार" ठरविले गेले आहे.

२. ज्या आदिवासींचे विस्थापन केले आहे. त्यांनाच निर्णय प्रक्रियेत समाविष्ट केले गेले नाही.

३. विस्थापितांची व्याख्याच चुकीची आहे. कारण हया व्याख्येत भूमिहीन, शेतमजूर, मच्छीमार, नावडीवाले, कारागिर दुकानदार इ. चा समावेश दिसत नाही.

४. ज्या ठराविक विस्थापितांचे पुनर्वसन इतर ठिकाणी झालेले आहे. तेथील लोक त्यांना सामावून घेत नाही.अशा वेळेस आदिवासींचे " डबल डिस्प्लेसमेंट " होताना दिसते. त्यामुळे आज बरेच असंघटीत क्षेत्रातील कामगार आदिवासीच आहेत.

५. हया सर्व पातळयांवर स्वत: आदिवासी काय म्हणतो त्याच्या वॉईसला किमंत दिली गेली नाही.

## ६. आव्हाने :

१. आज नक्षलवादी चळवळींचा विचार केला तर त्यात सर्वात जास्त नक्षलवादी हे आदिवासीच आहेत. तेव्हा आदिवासी स्टेट डेमोक्रॉसीला पर्याय म्हणून नक्षलवादाकडे बघत तर नाही ना ?

२. प्रस्थापित हे आदिवासींना मुख्य प्रवाहात सामावून घेण्याचा उल्लेख करतात. परंतु त्यावेळेस आदिवासींना अप्रगत, मागास व असंस्कृत ठरवून त्यांची संस्कती व अस्मिता देखील नाकारली जाते. त्यावेळेस "आयडेंटी क्राइसेस" निर्माण होतात. त्यामुळे तर नाही ना... विविध आदिवासी समुदायांनी मुख्यप्रवाहात सामावून घेण्यापेक्षा

आपले वेगळे प्रांत, प्रदेश स्वतंत्र मागितले आहेत (उदा. स्वतंत्र नागाभूमि, गोरखालँड झारखंड छत्तीसगड).

३. आदिवासी धर्मांतराला पर्याय का समजत असावा.

## ७. निष्कर्ष :

भारतीय राज्यघटनेवर आधारित असलेली संसदीय लोकशाही ज्यात कागदपत्रांद्वारे नागरिकत्व सिध्द होत असते. परंतु ते नागरिकत्व आदिवासीपर्यंत "जनगणनेद्वारा" पोहचलेलेच नाही. त्यामुळे अदिवासी आज घडीला स्वत:च्याच जन्म व कर्मभूमिवर उपरे, निर्वासीतच अतिक्रमणदार ठरविले गेले आहेत आणि म्हणूनच त्यांच्या नावावर रेशनकार्ड नाही, मतदानाचे कार्ड नाही आणि त्याच बरोबर ७:१२ देखील नाही. म्हणजेच ज्या निकषांवर भारतीय नागरिकत्व सिध्द होत असते त्यांचेच पुरावे आदिवासींकडे नाहीत.

भारतीय राज्यघटनेने व आंतरराष्ट्रीय मानवी हक्कांच्या सनदेने प्रदान केलेले हक्क प्राप्त करुन घेण्यासाठी गेले कित्येक वर्षे आदिवासींना लढा द्यावा लागला. त्यांचे फलित म्हणून केंद्र शासनाला वनजमिनीवरील आदिवासींचे वैयक्तिक मालकी हक्क व त्यांच्या परंपरागत सामूहिक हक्कांना मान्यता देणारा कायदा २००६ साली मंजूर कारणे भाग पडले. तरी देखील तो २००९ साली अमंलात आला.हया कायद्यानुसार १३ डिसेंबर२००५ पूर्वी ज्या जंगलनिवासी आदिवासींकडे शेतजमीन आहे. त्यांचीच नोंद झाली परंतु १३ डिसेंबर २००५ नंतरच्या आदिवासींचे काय हा प्रश्न अनुत्तरीत आहे. हया सारख्या अनेक प्रश्नाच्या उत्तरासाठी आदिवासी आज देखील शासनव्यवस्थेशी लढत उभा आहे. म्हणून जोपर्यंत स्थिर आणि शाश्वत लोकशाही व्यवस्था अस्तित्वात येत नाही. तोपर्यंत नागरिक या शासनव्यस्थेला विरोध करतच राहतील व मला तर असे वाटते की, आतापर्यंतच्या सर्व वॉईस ऑफ प्रोटेस्टमुळेच भारतात लोकशाही जिवंत गतीशील आहे.

## संदर्भसूची :

१ तेलतुम्बडे, आनंद (२००७) : "सामाजिक न्याय आणि जागतिकीकरण" लोकवाङ:मय गृह मुंबई. (२००७ : पृ. क्र. १०)

२ शहा घनश्याम (२००८) : "भारतातील सामाजिक चळवळी" डायमंड पब्लीकेशन्स पुणे (२००८ पृ. क्र. ११)

* * *

## TRIBAL RESEARCH & TRAINING INSTITUTE'S PUBLICATIONS FOR SALE

## संस्थेची विक्रीची प्रकाशने

| Sr. No. | Name | Price Rs. |
|---|---|---|
| 1. | An Overview Of Tribal Research Studies | 100.00 |
| 2. | Strategies For Promotion & Propagation Of Tribal Arts & Handicrafts | 50.00 |
| 3. | *"Nagarikanchi Sanad"* (Marathi Publication Of TDD, Mumbai) | 16.00 |
| 4. | Bi-Annual Publication "Tribal Research Bulletin"<br><br>(Annually subscription Is Rs.100/- only) | (Rs. 50/- per Bulletin) |
| 5. | Tribal Handicrafts of Maharashtra : Cultural & Transitional Perspective. | Rs.190/- |
| 6. | Tribal Development issues and challenges | Rs.225/- |
| 7. | The Mavchies | 85/- |
| 8. | Tribal Ornaments | 50/- |

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - ४११००१.



वारली चित्र स्पर्धेत स्पर्धकांना मार्गदर्शन करताना पद्मश्री जिवा सोमा म्हसे



वारली चित्रांची व वारली वाद्य तारपा यासह विक्री करताना वारली चित्रकार

## TRIBAL RESEARCH BULLETIN

Tribal Research & Training Institute,
Maharashtra State, Pune-411001.
Web Site : http://trti.mah.nic.in
Email: trti.mah@nic.in

Tribal Research Bulletin is a bi-annual bulletin published in March and September. Contributors can contribute articles pertaining to various aspects related to tribal life, culture and development.

### Guidelines for Contributors

The manuscripts to be published in this Bulletin should be typewritten in double space on one side of the paper and carefully edited for matter as well as language and corrected for any typing errors. The matter should be organized under suitable headings. Tables should be preferably incorporated in the body of the paper with relevant interpretation. Charts and maps should be in black and white only. Soft copy of the manuscript is welcome.

Manuscripts are not returned.

The views expressed by the authors do not necessarily reflect the views of the Government, and the Editor is not responsible for the views expressed by the authors.

The contributors will be given 2 reprints and two copies of the Bulletin.

All correspondences should be addressed to the Commissioner, Tribal Research and Training Institute, 28, Queen's Garden, Pune-411001.

Registration No. 37/438/79

**FORM IV**

(See Rule 80)

| | |
|---|---|
| 1. Place of publication | 28, Queen's Garden, Pune-411001 |
| 2. Periodicity of Publication | Bi-annual |
| 3. Printer's Name | Manager Photozinco Press, Pune-411001 |
| Nationality<br>Address | Indian<br>Photozinco Press, Pune-411001 |
| 4. Publisher's Name | D.D. Mayee |
| Nationality<br>Address | Indian<br>28, Queen's Garden, Pune-411001 |
| 5. Editor's Name | D.D. Mayee |
| Nationality<br>Address | Indian<br>28, Queen's Garden Pune-411001 |

I, D.D. Mayee, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

D.D. Mayee
(Signature of Publisher)

Annual Subscription Rs. 100/-
Cost of Single copy Rs.50/-

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे - ४११ ००१.